शुक्रवार, 27 मे 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 267
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • FRIDAY 27 MAY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-01 • ISSUE-267 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5

# देहविक्री गुन्हा नव्हे तर व्यवसाय

## सेक्स वर्कर्सच्या कामात पोलिसांनी हस्तक्षेप करता कामा नये; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने देहविक्री करणाऱ्या महिलांसंदर्भात (सेक्स वर्कर्ससंदर्भात) एक महत्वाचा निर्णय दिला. परस्पर संमतीने देहविक्री व्यवसाय करणाऱ्या महिलांची अडवणूक करण्याचा किंवा त्यांच्या कामामध्ये हस्तक्षेप करण्याचा त्याचप्रमाणे त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार पोलिसांना नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. देहविक्री हा गुन्हा नव्हे तर व्यवसाय असून या व्यवसायामधील महिलांना त्यांचा सन्मान आणि कायद्याने पुरवलेल्या सुरक्षेचा समान अधिकार असल्याचे निरिक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.**

त्रिसदस्यीय खंडपीठाने हा निर्णय दिला असून यापैकी न्या. एल. नागेश्वर राव यांनी देहविक्री व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासंदर्भात सहा निर्देशक तत्व सांगितली आहे. कायद्याकडून संरक्षण मिळवण्याचा देहविक्री करणाऱ्या महिलांनाही समान अधिकार आहे. वय आणि परस्पर संमती या निकषांवर गुन्हे दाखल केले जावते. जेव्हा एखादी देहविक्री करणारी महिला ही सज्ञान असेल आणि तिच्या इच्छेने शरीरसंबंध ठेवत असेल तेव्हा पोलिसांना त्या प्रकरणात पडण्याचा किंवा तिच्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार नाही. हे सांगण्याची गरज नाही की, व्यवसाय कुठलाही असला तरी या देशातील प्रत्येक व्यक्तीला घटनेतील २१ व्या कलमानुसार सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार आहे, असे खंडपीठाने म्हटले. खंडपीठाने देहविक्री करणाऱ्या महिलांना अटक करता येणार नाही असेही सांगितले आहे. छापेमारीदरम्यान या महिलांना अटक करणे, त्यांच्याकडून दंड आकारणे, त्यांचा छळ करणे किंवा त्यांना त्रास देणे बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाने म्हटले. वेश्यागृहे चालवणे



बेकायदेशीर असले तर संमतीने शरीरसंबंध ठेवण्याचा अधिकार सज्ञान महिलांना आहे, असे न्यायालयाने म्हटले. केवळ देहविक्री करणाऱ्या व्यवसायात असल्याच्या कारणावरून देहविक्री करणाऱ्या महिलेच्या मुलाला आईपासून वेगळे केले जाऊ नये, असे न्यायालयाने म्हटले आहे. मानवी मूल्यांना अनुसरुन वागणूक मिळणाऱ्याचा आणि प्रतिष्ठेचे मूलभूत संरक्षण करण्याचा अधिकार सेक्स वर्कर्स आणि त्यांच्या मुलांनाही आहे, असे न्यायालयाने नमूद केले. तसेच न्यायालयाने पुढे निर्णय देताना, जर एखादा अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी कुंटणखान्यात किंवा सेक्स वर्कर्ससोबत राहत असल्याचे आढळले, तर त्यांची तस्करी झाली आहे, असे समजू नये, असेही म्हटले. एखाद्या देहविक्री करणाऱ्या महिलेने त्यांच्याविरुद्ध लैंगिक अत्याचाराच्याअंतर्गत येणाऱ्या स्वरूपाचा गुन्हा झाल्याची तक्रार दाखल केली असेल तर पोलिसांनी त्यांच्यासोबत भेदभाव करू नये, असे आदेशही न्यायालयाने दिलेत. लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या सेक्स वर्कर्सना तत्काळ वैद्यकीय-कायदेशीर काळजीसह सर्व सुविधा पुरवल्या गेल्या पाहिजेत, असे न्यायालयाने म्हटले. पोलिसांचा सेक्स वर्कर्सबद्दलचा दृष्टिकोन अनेकदा क्रूर आणि हिंसक असतो. त्यांच्या हक्कांची दखल घेतली जात नाही अशा एखाद्या वर्गाप्रमाणे त्यांना वागणूक मिळते, असे म्हणत न्यायालयाने त्यांच्यासोबत संवेदनशीलपणे वागण्याचे आवाहन पोलीस यंत्रणेला केले. प्रसारमाध्यमांनी अटक, छापेमारी आणि बचाव कार्यादरम्यान या सेक्स वर्कर्सची ओळख उघड करू नये. मग ते पीडित असो किंवा आरोपी. त्यांची ओळख उघड होईल असे कोणतेही छायाचित्र प्रकाशित किंवा प्रसारित करू नयेत, अशी काळजी घ्यायला हवी, असेही न्यायालयाने सांगितले.

### कंडोमचा वापर म्हणजे गुन्ह्याचा पुरावा नाही

पोलिसांनी कंडोमचा वापर म्हणजे सेक्स वर्कर्सच्या गुन्ह्याचा पुरावा म्हणून अर्थ लावू नये, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. ज्या सेक्स वर्कर्सची सुटका करून दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले जाते त्यांना दोन-तीन वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी सुधारगृहात पाठवावे. सेक्स वर्कर्सना या सुधारणागृहांमध्ये ठेवले जाऊ शकते आणि जर दंडाधिकाऱ्यांनी असे ठरवले की सेक्स वर्करने संमतीने शरीरसंबंध ठेवल्याचे सिद्ध झाले किंवा सांगितले तर त्यांना सोडले जाऊ शकते, असे आदेशात म्हटले आहे. न्यायमूर्ती राव यांचे ठाम मत होते की संबंधित अधिकारी सेक्स वर्करला त्यांच्या इच्छे विरुद्ध सुधारगृहात राहण्यास भाग पाडू शकत नाहीत.

## चर्चेतली बातमी

### केंद्रीय कर्मचाऱ्यांचा १ जुलैपासून पगार वाढण्याची शक्यता



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या जवळपास ५० लाख कर्मचारी आणि ६५ लाख पेन्शनधारकांसाठी आनंदाची बातमी आहे. देशात वाढत्या महागाईदरम्यान मोठा दिलासा मिळू शकतो. सरकार एक जुलैपासून महागाई भत्त्यात वाढ करण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सरकार यावेळी महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ करण्याची शक्यता आहे. जर ही वाढ केली तर महागाई भत्ता ३४ टक्क्यावरून ३८ टक्के होईल. मार्चमध्ये AICPI INDEX मध्ये १ अंकाने वाढला होता. तो १२६ अंकांवर पोहोचला होता. दरम्यान, सरकारने मार्चमध्येच महागाई भत्त्यात वाढ केली होती. मात्र एप्रिल, मे आणि जून २०२२ साठी AICPI चे नंबर येणे बाकी आहे. जर हे मार्चच्या पातळीच्या वर राहिले तर सरकार महागाई भत्ता वाढवू शकतो. देशात महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. एप्रिलमध्ये किरकोळ महागाईचा दर ७.७९% च्या विक्रमी उच्चांकावर पोहोचला. तर अन्नधान्य महागाईचा दर ८.३८ टक्के राहिला. महागाईचा हा दर गेल्या ८ वर्षांच्या उच्च पातळीवर आहे.

# देशात पहिल्यांदाच ‘ड्रोन महोत्सवा’चे आयोजन

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते होणार उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशाची राजधानी दिल्लीतील प्रगती मैदानावर देशात प्रथमच ड्रोन फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र सरकार भारताला ड्रोनचे हब बनवण्याच्या तयारीत आहे. त्या दिशेने हे पाऊल उचलण्यात आले आहे. दोन दिवस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 27 आणि 28 मे रोजी राजधानी दिल्लीतील प्रगती मैदानावर होणाऱ्या या 8व्या महोत्सवाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. जिथे सर्व कंपन्या सहभागी होतील आणि त्यांच्या ड्रोनचे प्रात्यक्षिक दाखवतील. हा देशात पहिल्यांदाच ड्रोन महोत्सव होत असल्यामुळे सर्वांनाच उत्सुकता असून, मोठ्या प्रमाणात गर्दी होईल असे आयोजकांनी म्हटले आहे.



दरम्यान, नवी दिल्लीतील प्रगती मैदानावर भारतातील सर्वात मोठ्या ड्रोन महोत्वाचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी या महोत्सवाचे उद्धाटन करण्यात येणार आहे. ड्रोनच्या माध्यमातून किटकनाशकांचा शिडकावा कसा करायचा याचे प्रात्यक्षिक या महोत्सवात दाखवण्यात येणार आहे. हा महोत्सव दोन दिवसांचा असून तो २७ आणि २८ मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे हा ड्रोन महोत्सव कसा असेल याविषयी प्रत्येकालाच कुतूहल आहे. दरम्यान, या महोत्सवात ७० हून अधिक प्रदर्शक ड्रोनच्या विविध वापराचे प्रकार दाखवणार आहेत. सरकारी अधिकारी, सशस्त्र दल, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, खासगी कंपन्या आणि ड्रोन स्टार्ट अप्ससह १६०० हून अधिक प्रतिनिधी या महोत्सवात सहभागी होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी ड्रोन चालवणाऱ्या शेतकऱ्यांशीही संवाद साधणार आहेत. या महोत्सवात ७० हून अधिक प्रदर्शने भरवण्यात येणार असून यामध्ये ड्रोनच्या विविध उपयोगांबाबत माहिती दिली जाणार आहे. या महोत्सवात डिजिटल माध्यमातून ड्रोन पायलट प्रमाणपत्रांचे वितरण, उत्पादनांचे उद्घाटन, पॅनल चर्चा, ऑपरेशन्स दाखविण्यात येणार असून, मेड इन इंडिया ड्रोन टॅक्सीची प्रतिकृतीही दाखविण्यात येणार आहे.

# इंधन वितरकांचा लाक्षणिक संप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्रातील पेट्रोलियम इंधन वितरकांची बिकट आर्थिक परिस्थिती शासनाच्या लक्षात आणून देण्यासाठी, विविध जिल्हा संघटनांच्या मागणीनुसार, FAMPEDA (फेडरेशन ऑफ ऑल महाराष्ट्र पेट्रोलियम डीलर्स असोसिएशन) या राज्यस्तरीय संस्थेने 31 मे रोजी लाक्षणिक संप करण्याचे ठरवले असून तेल कंपन्यांच्या डेपोंमधून पेट्रोलियम उत्पादने खरेदी न करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत पीडीए औरंगाबाद चे सचिव अकील अब्बास यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, FAMPEDA सोबत एकजुटीने, PDA (पेट्रोलियम डीलर्स असोसिएशन) औरंगाबादच्या सदस्यांनी आमच्या ग्राहकांची गैरसोय होणार नाही याची खात्री करून 31 मे 2022 रोजी कोणत्याही खरेदीमध्ये सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे.



# पंढरीचे विठ्ठल मंदिर बुद्ध विहार !

## अभ्यासकाच्या दाव्यानंतर वारकरी संप्रदाय संतप्त, इतिहास अभ्यासकांनी खोडला दावा

आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : लाखो करोडो विठ्ठल भक्त आणि वारकऱ्यांचे आराध्य असलेले विठ्ठल मंदिर हे मूळ बौद्ध विहार असल्याचा दावा नागपूर येथील अभ्यासक प्रमोद आगलावे यांनी केला आहे. यानंतर वारकरी संप्रदाय आणि विठ्ठल भक्तात संतापाची लाट उसळली आहे. तसे पहिले तर वारकरी संप्रदायाचा इतिहास बाराव्या शतकापासून सुरु झाला पण त्याही पूर्वी हे विठ्ठल मंदिर होते. भाविक येथे दर्शनाला येत असल्याचा दावा वारकरी संप्रदायाकडून केला जातो. मात्र आगलावे यांच्या अभ्यासानुसार याही पूर्वी आठव्या ते नवव्या शतकात येथे बौद्ध विहार होता आणि त्याचेच मंदिर झाल्याचा दावा त्यांनी केला आहे.


### हा संपूर्ण दावा केवळ सवंग लोकप्रियतेसाठी


हा संपूर्ण दावा केवळ सवंग लोकप्रियतेसाठी केला जात असल्याच्या प्रतिक्रिया वारकरी संप्रदायातून येऊ लागल्या आहेत. ज्येष्ठ वारकरी संत बद्रीनाथ महाराज तनपुरे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, जोगदंड महाराज यांनी आगलावे यांचा दावा खोडून काढला आहे. वारकरी संप्रदायाचे प्रमाण हे संतवचने आहेत आणि आमच्या संतांनी हा विठ्ठल वारकऱ्यांचा असल्याचा दावा वारकरी संत करीत आहेत. हिंदू धर्मात विष्णूचा नववा अवतार हा बुद्धांचा मानला जातो आणि त्यातूनच अशी वक्तव्य समोर येत असतील असा दावा वारकरी संत करीत आहेत. अशा पद्धतीचा बुद्धिभेद कोणीही करण्याचा प्रयत्न केला तरी वारकरी संप्रदाय याला किंमत देत नसल्याची प्रतिक्रिया बद्रीनाथ महाराज तनपुरे यांनी दिली आहे.

### विठ्ठल सर्व जाती धर्माच्या संतांचे आराध्य दैवत

विठ्ठल हा सर्व जाती धर्माच्या संतांचे आराध्य असल्याने चातुर्वर्ण चौकात मोडून समतेचा संदेश या वारकरी संतांनी दिला. मात्र हे तत्वज्ञान बुद्धांच्या तत्वज्ञानाजवळ जाणारे असल्याचा दावा अभ्यासक सचिन परब यांनी केला आहे. तर पंढरपूरचाच इतिहास पाचव्या शतकापासून असून येथे मंदिर अथवा मूर्तीमध्ये हे बौद्ध विहार असल्याचा कोणताही पुरावा सापडत नसल्याचा दावा पंढरपूरच्या इतिहासाचे अभ्यासक ॲड धनंजय रानडे यांनी केला आहे.

विविध विचारधारांना विठुराया कायम आपला वाटत आला यावेळी पाचव्या शतकापासून असलेले विठ्ठल मूर्ती आणि मंदिरातील तांबरलेख शिलालेख याचे त्यांनी दाखले दिले. हे सर्व लोकप्रियतेसाठी सुरु असून पूर्वी अशाच एका अभ्यासकाने हाच दावा केला होता. मात्र तो दावा त्यावेळी खोडून काढला होता असे रानडे यांनी सांगितले. एकंदर महानुभाव पंथ असो, जैन संप्रदाय असो, बुद्ध संप्रदाय असो, सुफी संप्रदाय असो अथवा लिंगायत संप्रदाय असो या विविध विचारधारांना विठुराया कायम आपला वाटत आला आहे आणि हेच या लोकदेवाचे वैशिष्ट्य आहे. यावरून काहीजणांना वाद निर्माण करायचा असेल तर त्याला भारत सरकारचा संशोधन विभाग उत्तर देईल मात्र विठुरायावर जीवापाड प्रेम करणारा विठ्ठलभक्त अशा कोणत्याही दाव्याचा कधीच स्वीकार करणार नाही एवढे नक्की.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# गेले द्यायचे राहुनी...

आधुनिक केसरी

कवी आरती प्रभू यांची एक सुंदर कविता आहे.
गेले द्यायचे राहुनी तुझे नक्षत्राचे देणे
माझ्यापाशी आता कळ्या आणि थोडी ओली पाने
कधी कधी असं सुंदर, आवश्यक असलेलं नक्षत्रांचं देणं राहून जातं. हातात फार काही उरत नाही. काळ हातातून निसटून गेलेला असतो. राहून गेलेल्या गोष्टींची बोच मात्र मनाला लागून राहते. कधी कधी मला वाटतं की आपलं आयुष्य एखाद्या क्रेडिट कार्डसारखं आहे. काय हवं ते आपल्याला आधी देऊन टाकलेलं असतं. नंतर आपल्याला ते फेडायचं असतं. आपण ते ऋण कसं फेडतो यावर पुढील सगळा व्यवहार अवलंबून असतो. आईवडील आपल्याला शिकवतात, मोठं करतात. गुरुजन ज्ञान देतात. शेतकऱ्याने शेतात अन्न पिकवल्याने आपल्याला खायला मिळतं. मित्र, समाज, आप्तेष्ट या साऱ्या साऱ्यांचं आपल्यावर ऋण असतं. ते जमेल तसं आपल्याला परत करायचं असतं. त्याच्यासाठी मुदत दिलेली नसते, ठराविक असं व्याज नसतं आणि फेडलं नाही तर काही गुन्हा दाखल होण्याची शक्यता फारशी नसते. पण परत करणं हे आपलं नैतिक कर्तव्य असतं. आपल्यावरचे संस्कार किती प्रभावी आहेत त्यावर हे ठरतं. माझं ज्यांच्यावर खूप प्रेम होतं असे माझे वडील शेवटी शेवटी थकले होते. त्यांचं वय बरंच झालं होतं. मी शाळेत शिक्षक म्हणून काम करत होतो. मी शाळेत जायला निघालो की त्यांचं लक्ष माझ्याकडे असायचं. माझ्या चेहऱ्याकडे नजर लावून असायचे. ' बाबा, येतो मी...' असं म्हटलं की त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलायचं. असं वाटायचं की त्यांच्या डोळ्यातल्या दोन ज्योती माझ्या शरीराभोवती एक आशीर्वादरुपी कवच बनून माझं रक्षण करताहेत. बऱ्याचदा त्यांना सांगूनच जायचो मी. पण कधी कधी धावपळीत असताना माझ्याकडून तेवढंही सांगणं व्हायचं नाही. मी गर्दीत निघून जायचो. त्यांचे डोळे आशेने माझ्याकडे लागलेले असायचे. मग मलाच अपराध्यासारखं वाटायचं. काय विशेष असं हवं असायचं त्यांना... ? जाताना आपल्या मुलानं त्यांच्याकडे प्रेमभराने पाहावं, सांगून जावं एवढीच त्या प्रेमळ पित्याची अपेक्षा असायची.
शाळेत प्रचंड काम असायचं. वर्गात मोठमोठ्यानं शिकवणं, घसा दुखायचा. मुलांची सारखी कलकल. शाळेतून आलो की डोकं भणाणून गेलेलं असायचं. मग असं वाटायचं की कोणाशी काहीच बोलू नये. काही काळ अगदी शांत बसून राहावं. तसा प्रयत्न करायचो देखील. पण त्यावेळी पुन्हा वडिलांची अपेक्षा असायची की मी क्षण दोन क्षण त्यांच्याजवळ बसावं. त्यांची थोडी मायेनं चौकशी करावी. पण त्या परिस्थितीत कधी कधी तेही नाही व्हायचं माझ्याकडून. बाबा तर आता नाहीत. पण आता ते क्षण आठवले की वाटतं आपलं चुकलंच. आपण कितीही थकलेलो असलो, काही असलं तरी त्यांच्याजवळ बसायला हवंच होतं. त्यांची आस्थेनं विचारपूस करायला हवी होती. त्यांना वेळच्या वेळी जेवणखाण, औषधे सगळं काही मिळत होतं. पण तेवढंच पुरेसं होतं का? **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# अघटीत घटना विसरून नैराश्य टाळावे

आधुनिक केसरी

एकप्रकारची उदासीनता, दुःख, मानसिक गोंधळ, आंतरिक संभ्रम, प्रचंड मानसिक तणाव आणि कालांतराने नैराश्य पदरी येते. ह्या प्रत्येक अंतर्मनाच्या स्थित्यंतराचा खूपच विपरीत, नकारात्मक वातावरण निर्माण करणारा परिणाम होत राहतो. वर्तमानात राहून आपल्या कर्तुत्वाच्या आधारे यशप्राप्ती करणे हे सुज्ञपणाचे लक्षण असते. नवनवीन आव्हाने स्वीकारण्याचे धैर्य, कसब, कौशल्य आपल्यात निर्माण होण्याची गरज अधिक असते. ह्या आभासी दुनियेत स्वप्नवत जगायची सवय लागणे घातक ठरू शकते. अपयश आणि नैराश्य पदरी आल्यावर दोष मात्र इतरांना, आपल्या नशिबाला, नाही तर मग दैवाला द्यायला सुरुवात होते. डोळ्यावरील भ्रमाची झापडे काढून वस्तुस्थिती, सद्यःस्थिती आणि एकूणच परिस्थितीची जाणीव होणे आवश्यक असते. त्यासाठी सर्वप्रथम, नैराश्य टाळण्यासाठी जीवनशैलीत बदल आवश्यक असतो, हे अभ्यासपूर्वक समजून घेतले पाहिजे. उदासीनता केवळ मेंदूतील विशिष्ट रसायने जास्त किंवा खूप कमी झाल्याने उद्भवत नाही, शास्त्रीय संशोधन असे सूचित करते. मेंदूतील रासायनिक बदल, चुकीचे मूड नियमन, अनुवांशिकता, असुरक्षितता, जीवनातील तणावपूर्ण घटना, औषधे आणि वैद्यकीय समस्यांसह नैराश्याची अनेक संभाव्य कारणे आहेत. नैराश्याचे कोणतेही एक विशिष्ट असे कारण नसते. नैराश्य विविध कारणांमुळे येऊ शकते आणि त्याचे अनेक भिन्न प्रकार, कारणे आहेत. काही व्यक्तींसाठी, शोक, घटस्फोट, आजारपण, अनावश्यक विचार आणि नोकरी किंवा पैशाची चिंता यासारख्या जीवनातील अस्वस्थ करणाऱ्या किंवा तणावपूर्ण घटना ही देखील कारणे असू शकतात. वेगवेगळ्या कारणांमुळे अनेकदा कोणत्याही वेळेला, केवळ अघटीत घटनांच्या आठवणींमुळे देखील नैराश्य निर्माण होऊ शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## अनाथांची वारी | धन्य झाली ||

कर्तव्याची जाण | असावी संसारी ||
शोधावी पंढरी | अंतरात ||१||

नसावा आकस | दुजाभाव उरी ||
भजावा अंतरी | पांडुरंग ||२||

जपावे वैराग्य | करूनी संसार ||
नेक व्यवहार | सुखदायी ||३||

सदा संतवृत्ती | ज्याच्या मनी वसे ||
माऊलीच दिसे | त्याचे ठायी||४||

मायबाप झाला | पंढरीचा हरि ||
अनाथांची वारी | धन्य झाली ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**मौनान्मूकः प्रवचनपटुर्वातुलो जल्पको वा**
**धृष्टः पार्श्वे वसति च सदा दूरतश्चाप्रगल्भः ।**
**क्षान्त्या भीरूर्यदि न सहते प्रायशो नाभिजातः**
**सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ।।**

**अर्थ :** सेवक मौन राहीला, तर तो मुका आहे, असे म्हटले जाते. वाक्पटु असेल, तर त्याला वाचाळ म्हणजे बडबडा म्हणतात. नेहमी मागे राहत असेल, तर त्यास धृष्ट संबोधण्यात येते. नेहमी दूर राहत असेल, तर त्यास अप्रगल्भ म्हणतात. सहनशील असेल, तर भित्रा म्हणतात. सहन करीत नसेल, तर अयोग्य म्हणतात. नक्कीच, सेवाधर्म परम गहन आहे. तो योगिजनांसाठीही अगम्य आहे. सेवा करणे अर्थात एखाद्याकडे सेवक म्हणून राहणे, कसे अवघड आहे; या विषयी या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी प्रतिपादन केले आहे. सेवकाच्या कोणत्याही वागण्याचा कसा चूकीचा अर्थ काढण्यात येऊ शकतो, या विषयी या श्लोकात विस्तृतपणे सांगण्यात आले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



# साधक निरूपण

आधुनिक केसरी

**साधक कुणाला म्हणतात ?**
संतसंगतीने प्रथम आत्मज्ञानाचे ध्येय प्राप्त होते. संतांच्या विचारांचा प्रभाव तुमच्यावर एवढा पडतो की तुम्हाला ध्येय गाठण्याचा मार्ग सहज सापडतो.आठव्या मुमुक्षु समासात तर आपण पाहिले आहे की मुमुक्षलक्षण हे संतसंगतीवर आधारलेले आहे. प्रापंचिक दुःखांचा चटका बसून संसाराची अपूर्णता जाणवली की मुमुक्षलक्षणास आरंभ होतो. आपण कुठेतरी अपूर्ण आहोत याची जाणीव होते. आपल्यातले दोष दिसु लागतात, प्रपंचाचा डोलारा कुचकामी वाटू लागतो. संतसंगतीची ओढ वाटू लागते. त्यांना साधक म्हणतात.साधकाने संताच्या जवळ किंवा सानिध्यात राहून “अनुसंधानाची” विद्या शिकायची असते. “मी देहच आहे या भावनेत रहाणारा साधक “ मी आत्माच आहे” या भावनेत रहाण्याचा अभ्यास करत रहातो. देहाचे अनुसंधान बाजूला सारून आत्मस्वरूपाचे अनुसंधान ठेवायची युक्ती साधणे हे साधकाच्या साधनेचे फलीत होय. साधकाची साधना योग्य रितीने चालु आहे हे समजते. सात्विकतेच्या आहार,विहार व विवेचनात समजेली साधकता व सात्विकतेच्या मार्गावरून जाते. जुने आचारविचार बदलून नवीन स्वस्वरूपांत आचारविचारांवर अखंड धारणा धरावी लागते.देहावर व द्रुश्यावर सहजपणे रहाणारे मन सततच्या अभ्यासाने आत्म्यापाशी किंवा स्वस्वरूपापाशी ठेवण्यात अखंड धारणा धरावी लागते. सैरावैरा धावणाऱ्या मनाला व इंद्रियामध्यें पसरलेल्या मनाला स्वैर वागु दिले जात नाही. ज्याला ही साधन साधते तो साधक होय.
समर्थांनी 62 ओव्यात "साधकनिरूपण" हा समास गुंफला आहे. त्यात साधक कसा असावा,साधकाची लक्षणे कोणती याचे खुप विचारांने , व आपल्या सारख्या साधकाने कसे असावे याचे खुप सुंदर वर्णन केले आहे. आपल्यातील अवगुणांचा त्याग करून जो संतसंग धरतो त्याला 'साधक'असे म्हणतात. **(क्रमशः)**




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# भगवंताचे स्मरण ही सद्‌बुद्धी

आधुनिक केसरी

परमेश्वर सर्व ठिकाणी भरलेला आहे, सर्व विश्व व्यापून आहे. मग त्याच्या अस्तित्वाची जाणीव प्रत्येकाला का होत नाही ? ज्याची भावना प्रगल्भ झाली असेल, त्यालाच परमेश्वराचे अस्तित्व जाणवेल, इतरांना नाही. म्हणून तशी भावना असणे जरूर आहे, आणि ती उत्पन्न होण्यासाठी परमेश्वराच्या स्मरणाची आवश्यकता आहे. मी नामस्मरण करतो असे जो म्हणतो, तो माझ्यावर उपकार करतो असे मला वाटते; कारण जी व्यक्ति नामस्मरण करते, ती स्वतःचा उद्धार करून घेत असते, म्हणजे पर्यायाने माझ्यावर उपकारच करीत असते.
बुद्धिवाद्यांना एक शंका अशी येते की, परमेश्वर हा जर बुद्धिदाता आहे, तर मग दुर्बुद्धी झाली तर तो दोष माणसाचा कसा म्हणता येईल ? याला उत्तर असे की, बुद्धिदाता परमेश्वर आहे हे अगदी खरे; पण त्या बुद्धीची सद्‌बुद्धी किंवा दुर्बुद्धी का होते हे पाहणे जरूर आहे. प्रकाश-काळोख या दोहोलाही कारण सूर्यच असतो. सूर्याचे अस्तित्व हे उजेडाला आणि नास्तित्व हे काळोखाला कारण आहे. तसे भगवंताचे स्मरण हे सद्‌बुद्धीला आणि विस्मरण दुर्बुद्धीला



कारण आहे. म्हणून, बुद्धीदाता परमेश्वर हे जरी खरे असले, तरी सद्‌बुद्धी वा दुर्बुद्धी ठेवणे हे मनुष्याच्या हातात आहे. भगवंताचे स्मरण ठेवले म्हणजे दुर्बुद्धी होणार नाही. म्हणून नेहमी भगवंताच्या स्मरणात राहावे; आणि याला उपाय म्हणजे नामस्मरण. सर्व सोडून भगवंताच्या स्मरणात राहिले पाहिजे. परंतु व्यवहार नीट करून त्यामध्ये भगवंताचे अनुसंधान ठेवणे, हे त्याहीपेक्षा श्रेष्ठ होय. भगवंताच्या कृपेने प्राप्त झालेला आजचा दिवस आपण त्याच्याकडेच लावणे जरूर आहे. भगवंताचे अनुसंधान ठेवले म्हणजे दिवस त्याच्याकडे लागतो. अशा रीतीने आजचा दिवस भगवंताच्या अनुसंधानात घालविला तर आपल्याला नित्य दिवाळीच आहे. अनुसंधानात स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब, हे भेद नाहीत. इतर साधनांनी जे साधायचे, ते नुसत्या अनुसंधानाने साधते. हाच या युगाचा महिमा आहे. इतर विषय मनात न येता एकाच विषयावर मन एकाग्र करणे, याला अनुसंधान असे म्हणतात. भगवंताचे अनुसंधान हेच खरे पुण्य होय, आणि हीच आयुष्यात मिळविण्याची एकमेव गोष्ट आहे. एक भगवंताचे अनुसंधान ठेवा, म्हणजे इतर सर्व गुण आपोआप मागे चालत येतील. भगवंताला अनन्यभावे अशी प्रार्थना करावी की, "देवा, प्रारब्धाने आलेले भोग येऊ देत, पण तुझे अनुसंधान मात्र चुकू देऊ नको."
**बोधवचन : नाम व अनुसंधान चोवीस तास चालायला पाहिजे. तेथे दुसरी एखादे गोष्ट वेळेवर न झाली तर त्याचा आग्रह नसावा.**

**श्रीसद्‌गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# अमरावती वकील संघाचे बेमुदत काम बंद आंदोलन सुरूच राहणार

## ठाणेदार चोरमलेसह इतर पोलिस कर्मचाऱ्यांवर निलंबनाची मागणी तीव्र

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** शहर पोलिस स्टेशन अंतर्गत गाडगेनगर पोलिस स्टेशनचे नेहमीचे वादग्रस्त असलेले ठाणेदार आसाराम चोरमलेसह पोलिस ठाण्यातील संबंधीत कर्मचाऱ्यांवर जोपर्यंत निलंबनाची कारवाई करण्यात येत नाही तोपर्यंत अमरावती जिल्हा वकिल संघाने आजपासून बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले आहेत. ॲड. अंकुश तागडेंवर गाडगेनगर पोलिस ठाण्याचे ठाणेदार चोरमलेसह इतर संबंधीत काही कर्मचारी यांनी नाहक अन्याय केल्याप्रकरणी अमरावती जिल्हा वकिल संघाने हे काम बंद आंदोलन सुरू केले आहे. गुरूवारी अमरावती जिल्ह्यासह आकोला व यवतमाळ जिल्ह्यांमध्येही वकिलांचे काम बंद आंदोलन झालेत. या संपूर्ण प्रकरणाची धग आता राज्यभर पेटणार आहे, असे अमरावती जिल्हा वकिल संघाचे अध्यक्ष शोएब खान यांनी सांगितले.

नेहमीचं वादात असणारे व आपल्या बेफीकर स्वभावामुळे ओळखले जाणारे गाडगेनगर पोलिस ठाण्याचे ठाणेदार आसाराम चोरमले यांनी एका प्रेमविवाह प्रकरणी प्रेम विवाहातील वराकडून गेलेले वकिल म्हणून अंकुश तागडेंवर सूड उगविला. प्रकरण असे की, गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या न्यु.एकविरा कॉलनीतील दोन परिवारातील युवा-युवतीने स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत प्रेमविवाह केला. विवाहीत मुलगा आपल्या पत्नीला चांदूरबाजार येथे घेवून गेला असता मुलीच्या वडिलांनी आपली मुलगी हरविल्याची तक्रार गाडगेनगर पोलिस ठाण्यात केली व गाडगेनगर पोलिस ठाण्यातील महिला पोलिस उपनिरीक्षक यांच्यासह काही पोलिस कर्मचारी खाजगी वाहनाने चांदूरबाजार येथे सूर्यास्तानंतर सायंकाळी ७ वाजता पोहचले व नवविवाहित दाम्पत्याला जबरीने आणण्याचा प्रयत्न केला. घाबरलेल्या अवस्थेत मुलांकडील नातेवाईकांनी मुलाला नेऊ देण्यास नकार दिल्यानंतर नवविवाहीत मुलीला हा पोलिस ताफा गाडगेनगर पोलिस ठाण्यात घेवून आला.



घाबरलेल्या अवस्थेत नवविवाहीत मुलाने ॲड.अंकुश तागडेंना भ्रमणध्वनीवर संपर्क साधून सर्व प्रकार सांगत मदत मागितली. वकिल म्हणून ॲड.अंकुश तागडे हे रात्री १० वा.च्या सुमारास गाडगेनगर पोलिस स्टेशनमध्ये पोहचलेत. ठाणेदार चोरमलेंना त्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्देशाचा दाखला देत कोणत्याही स्त्रीला सूर्यास्तानंतर पोलिस ठाण्यात बोलावता येत नसल्याचे सांगितले व बयान घेण्यास त्यांच्या घरीच घ्यायला हवे होते असे ते ही म्हणाले. ठाणेदार चोरमलेंना उच्च न्यायालयाचा दाखला दिल्याचे खटकले व त्यांच्या नेहमीच्या स्वभावानुसारच ते ॲड. अंकुश तागडेंवर भडकले व शिविगाळ करीत तागडेंना मारहाण सुध्दा केली पण यावरच न थांबता त्यांच्या अधिनस्थ असणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांनी सुध्दा तागडेंना मारहाण करीत त्यांचा मोबाईल व पैसे सुध्दा घेतले असा आरोप ॲड. अंकुश तागडेंसह अमरावती वकिल संघानी केला आहे.

ॲड. अंकुश तागडेंवर ठाणेदार चोरमले यांनी तक्रार दाखल करीत सरकारी कामात अडथळा आणण्याचा गुन्हा नोंदवून ३५३ गुन्ह्याखाली त्यांना तेव्हाच अटक करून रात्रभर पोलिस कोठडीत ठेवले. ॲड. तागडेंकडे संपर्कासाठी कोणतेच साधन नसल्यामुळे त्यांना संपूर्ण रात्र पोलिस कोठडीतच काढावी लागली. दुसऱ्या दिवशी काही वकिलांना कळताच तीन ते चार वकिलांनी ठाणेदार चोरमलेंची भेट घेतली असता त्यांना ही चोरमलेंनी निराशाजनक उत्तरे देत स्वतःचीच बाजू कशी बळकट आहे ते सुनावले. अखेर तागडेंवर झालेल्या मारहाणी व अपमानजनक व्यवहारानंतर ही ॲड.तागडेंना याच पोलिस यंत्रणेंनी सराईत गुन्हेगारासारखे हाथकड्या घालून न्यायालयात हजर केले. या सर्व गंभीर प्रकरणात वारंवार पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शनच तुडवले हे म्हणण्यात काही गैर नाही. हाथकड्या घालण्यासाठीही उच्च न्यायालयाचे काही निर्देश असता हत्या, फाशी किंवा जन्मठेपेची शिक्षा झालेला कैदी किंवा १० वर्षावरील शिक्षा सुनावण्यात आलेल्या कैद्यांवर हाथकड्या घालण्याचे बंधन आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशनानुसार याप्रकरणी ॲड. तागडेंना हाथकड्या घालणे म्हणजे संबंधी पोलिस यंत्रणेचे कायद्यात हात अडकण्याचे चिन्ह दिसत आहे. याबाबतही अमरावती जिल्हा वकिल संघ उच्च न्यायालयात दाद मागणार व महाराष्ट्र वकिल संघाकडे तक्रार करणार असल्याचे अमरावती जिल्हा वकिल संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांना सांगितले.

या काम बंद आंदोलनात अमरावती जिल्हा वकिल संघाचे अध्यक्ष ॲड. शोएब खान, उपाध्यक्ष ॲड. जितेंद्र देशमुख, सचिव ॲड. मुकेश देशमुख, ॲड. श्रीकांत पांडे, सदस्य ॲड. भूषण कोकाटे, ॲड. चेतन बुंदेले, ॲड.सुमीत शर्मा, ॲड. सुषमा रायबोले, ॲड. गुप्ता, ॲड.संदीप वानखडे, ॲड. गौरव मुंदे, ॲड.सतीश उपाध्याय, ॲड. सिध्दार्थ गायकवाड, ॲड. शैलेश तिवारी, ॲड. शमीम, ॲड. शयजाद, ॲड. शैलेश तिवारी, ॲड. संतोष यादव, ॲड. विजय राजुरकर, ॲड.सचिन मोरे, ॲड. प्रेम धामोदर, ॲड. निलेश मारोडकर, ॲड. नासीर खान, ॲड. निसार खान, ॲड. अजहर शमीम, ॲड. अतुल काकडे, ॲड. दिया खान, ॲड. चिराग नवलानी, ॲड. वासुदेव नवलानी, ॲड. प्रशांत देशपांडे, ॲड. चितलांगे, ॲड. चंद्रकांत डोरले, ॲड. सुनील देशमुख, ॲड. राजेश गवळी, ॲड. आनंद पुरोहित, ॲड. रघुपती रामटेके, ॲड. शहजेब खान, ॲड. प्रेम दामोधर, ॲड. विकास गवई, ॲड. भारत खडसे, ॲड. सुधीर तायडे, ॲड. शशीकांत गवई, ॲड. विक्रम सर्वटकर, ॲड. प्रवीण गायकवाड, ॲड. मोहीत कासरे, ॲड. मोहसीन शेख, ॲड. नासीर यांच्यासह अमरावती वकिल संघाचे सर्व पदाधिकारी व वकिल सहभागी होते. या प्रकरणाचा वकिल संघातर्फे नव्हेतर सर्वसामान्य नागरिकांकडूनही निषेध होत आहे. एका जबाबदार प्रतिष्ठित वकिलावर जर काही पोलिस अधिकारी व कर्मचारी अशा क्रूरपणे अन्याय करीत असतील तर सामान्य नागरीकांना कसा न्याय मिळेल? हा प्रश्न आता अमरावतीकरांसमोर उभा आहे.

# वामनदादा कर्डक आंबेडकरी प्रतिभेचे महाकवी होते

## अभ्यासक प्रशांत वंजारे यांचे प्रतिपादन; साहित्य संमेलनात परिसंवाद रंगला

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** वामनदादा कर्डक हे केवळ महाकवीच नव्हते तर ते आद्य गझलकार म्हणून परिचित होते. सुरेश भटांच्याही आधी वामनदादा यांनी गझला लिहिल्या होत्या. सुरेश भटांसोबत सुद्धा त्यांची भेट झाली होती. वामनदादांच्या काव्यातून सतत आंबेडकरवाद प्रसवत राहिला. वामनदादा कर्डक आंबेडकरी प्रतिभेचे महाकवी होते असे मत अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य आणि संस्कृती संवर्धन महामंडळाचे निमंत्रक प्रशांत वंजारे यांनी व्यक्त केले. ते महाकवी वामनदादा कर्डक जन्मशताब्दी साहित्य संमेलनात आयोजित परिसंवादात बोलत होते. यावेळी मंचावर प्रा. दत्ता भगत, प्रा. सुषमा अंधारे, स्वागताध्यक्ष बालाजी इबितदार, निमंत्रक जी.पी. मिसाळे, संयोजन समितीचे अध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, कोंडदेव हटकर, राज गोडबोले, भीमराव हटकर आदींची उपस्थिती होती.

सत्यशोधक फाऊंडेशन आणि मानव विकास संशोधन सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील कुसुम सभागृहात महाकवी वामनदादा कर्डक जन्मशताब्दी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात 'वामनदादा यांच्या गाण्यांतील समग्र आंबेडकरवाद' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी वंजारे बोलत होते. ते म्हणाले की, वामनदादांनी आंबेडकरी साहित्य या संकल्पनेचा पुरस्कार केला होता. त्यांनी त्यांच्या काव्यातून आंबेडकरी भूमिकाच मांडल्या होत्या. आंबेडकरी



साहित्य हे मानवमुक्तीच्या लढ्यातून जन्म घेऊन आलेले साहित्य आहे. आंबेडकरी साहित्य हे वेदनेचे, नकाराचे साहित्य नाही तर दुःख मुक्तीचे साहित्य आहे. व्यवस्थेचा विरोध दर्शवणारं, जगण्याची व्यथा मांडणारं, प्रस्थापितांविरोधात विद्रोह करणारं, परिवर्तनाची भूमिका घेणारं, परंपरांना नकार देणारं एकूणच जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणणाऱ्या क्रांतीचं साहित्य हे आंबेडकरी साहित्यच आहे. या भूमिका वामनदादांनी घेतल्या होत्या हे आपण समजून घेणं आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

परिसंवादाचे सूत्रसंचालन इंजि. भीमराव हटकर यांनी केले तर आभार प्रज्ञाधर ढवळे यांनी मानले. परिसंवादाच्या यशस्वीतेसाठी एन.डी. गवळे, एन.डी. पंडित, बाबुराव कसबे, प्रभू ढवळे, नितीन एंगडे, डॉ. राम वनंजे, रमेश कसबे, संजय जाधव, ज्ञानोबा दुधमल, राहुल गवारे, एम.एस. गव्हाणे, आर.पी. झगडे, अशोक मल्हारे, नागोराव डोंगरे, शंकर गच्चे, कैलास धुतराज, प्रशांत गवळे, रुपाली वागरे वैद्य, बाबुराव पाईकराव, रणजीत गोणारकर, प्रकाश ढवळे, संतोष तळेगावे, मिलिंद नरवाडे आदींनी परिश्रम घेतले. सभागृहात रसिक प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# परब यांची ईडीकडून १३ तास मॅरेथॉन चौकशी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्राचे परिवहन मंत्री अनिल परब यांच्या घरावर ईडीने आज छापेमारी केली. ईडीच्या अधिकाऱ्यांनी त्यांची १३ तास मॅरेथॉन चौकशी केली. दापोली येथील साई रिसॉर्ट चालू नसताना केंद्रीय पर्यावरण विभागाकडून खोटा गुन्हा दाखल केला गेला. आजची चौकशी फक्त रिसॉर्टविषयी होती. परंतु सूडबुद्धीने ही कारवाई सुरु होती, अशी प्रतिक्रिया अनिल परब यांनी दिली.

१३ तासांच्या मॅरेथॉन चौकशीनंतर अनिल परब यांनी माध्यमांशी संवाद साधला. अधिकाऱ्यांनी कोणकोणते प्रश्न विचारले, कोणत्या विषयांवर चौकशी झाली, याबद्दलची माहिती त्यांनी प्रसारमाध्यमांना दिली. दापोली येथील साई रिसॉर्टसंबंधी आज माझी चौकशी केली गेली, असे अनिल परब यांनी सांगितले.

परब म्हणाले, आज ईडीच्या अधिकाऱ्यांनी माझ्या निवासस्थानावर तसेच माझ्याशी संबंधित काही लोकांवर छापे मारले. गेल्या काही दिवसांपासून या बातम्या सतत येत होत्या. ईडीची कारवाई होणार, अशा बातम्या सातत्याने कानावर पडत होत्या. यामागील गुन्हा तपासला असता असे लक्षात आले, दापोली येथील साई रिसॉर्ट, जे मी पहिल्या दिवसापासून सांगतोय, याचे मालक सदानंद कदम आहेत. याचा मालकी हक्क त्यांनी सांगितला आहे. कोर्टातही तसा दावा केला आहे. त्यांनी खर्चाचे सर्व हिशोब आयकर विभागाला दिले, हे सगळे असताना हे रिसॉर्ट अजून पूर्ण झालेले नाही. असे असताना पर्यावरणाची दोन कलमं लावून या रिसॉर्टमधून सांडपाणी समुद्रात जाते अशा प्रकारचा चुकीचा गुन्हा केंद्रीय पर्यावरण खात्याने दापोली पोलिसांत दाखल केला आहे.

जे रिसॉर्ट सुरूच नाही ज्याच्याबद्दल प्रदुषण महामंडळाने रिपोर्ट दिला, पोलिसांनी रिपोर्ट दिलाय की हा रिसॉर्ट सुरू नाही. तरी देखील माझ्या नावाने, साई रिसॉर्टच्या नावाने नोटीस काढली गेली, तक्रार दाखल केली गेली. त्याला प्रेडिगेटेड ऑफेन्स समजून ईडीने माझ्यावर छापेमारीची कारवाई केली. त्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तर मी दिलेली आहे. यंत्रणांच्या कुठल्याही प्रश्नांना मी उत्तर द्यायला तयार आहे, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

यापुढेही त्यांनी मला प्रश्न विचारले तर त्याला उत्तर देण्याची तयारी आहे. बंद रिसॉर्टचे सांडपाणी समुद्रात कसे जाईल. या सर्व गोष्टींचा खुलासा कोर्टात होईल, चौकशीअंती सगळे सत्य समोर येईल. मी चौकशीला पुढे गेलो आहे आणि यापुढेही मी चौकशीला जाईल. मी प्रत्येक गोष्ट कायद्याला पुढे ठेवून बघतो, त्यामुळे मला माहितीये कायद्यानुसार काय होऊ शकते, काय होऊ शकत नाही, त्यामागील काय अर्थ काढायचे ते वेळ आल्यावर पाहू, असेही परब म्हणाले.

# व्यावसायिक अविनाश भोसले यांना सीबीआयकडून अटक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पुण्यातील व्यावसायिक अविनाश भोसले यांना सीबीआयने अटक केली आहे. अविनाश भोसले यांची यापूर्वी ईडी आणि सीबीआयने चौकशी केली होती. सीबीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार डीएचएफल प्रकरणात अविनाश भोसले यांना अटक करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून सीबीआयकडून अविनाश भोसले यांचा शोध सुरु होता. ईडीने यापूर्वी फेमा कायद्यांअंतर्गत अविनाश भोसले यांची चौकशी केली होती. सीबीआयने गेल्या काही दिवासांपूर्वी भोसले यांच्या घरी छापे टाकले होते. अविनाश भोसले यांना अटक केल्यानंतर सीबीआय नेमकी काय कारवाई करणार येणाऱ्या काळात समोर येईल. ईडीने गेल्यावर्षी अविनाश भोसले यांची संपत्ती जप्त केली होती. डीएचएफएल प्रकरणात सीबीआयकडून त्यांचा शोध घेण्यात आला होता.

अविनाश भोसले यांच्यावर ईडीनं गेल्यावर्षी कारवाई केली होती. अविनाश भोसले यांची ४० कोटींची संपत्ती गेल्यावर्षी जूनमध्ये जप्त करण्यात आली होती. अविनाश भोसले यांच्या व्यावसायिक भागीदारांवर देखील छापे टाकण्यात आले होते. डीएचएफएल येस बँक लोन प्रकरणी अविनाश भोसले यांच्यावर सीबीआयने ही कारवाई केली आहे. सीबीआयने अटकेची कारवाई करण्यापूर्वी ३० एप्रिल रोजी छापे टाकण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. अविनाश भोसले यांचे मित्र आणि व्यावसायिक भागीदार यांच्यावर देखील सीबीआयने छापे टाकले होते. मुंबईतील मालाडमध्ये सीबीआयने छापे टाकले होते, अशी माहिती आहे. सीबीआयनं ३० एप्रिलला ८ ठिकाणी छापे टाकले होते. अविनाश भोसले हे एबीआयल ग्रुपचे मालक आहेत.

**कोण आहेत अविनाश भोसले?**

अविनाश भोसले यांची बांधकाम व्यावसायिक म्हणून पुण्यासह राज्यातील विविध भागांत ओळख आहे. तसेच व्यवसायासोबतच राजकीय नेत्यांसोबतच्या संबंधांमुळेही भोसले चर्चेत असतात. काँग्रेस नेते आणि राज्यमंत्री विश्वजीत कदम यांचे ते सासरे आहेत. मात्र भोसले यांचा सर्वच राजकीय पक्षांतील नेत्यांसोबत संपर्क असल्याचे बोलले जाते. गेल्या काही काळापासून ईडीने त्यांच्याविरोधात कारवाईचा धडाका सुरू केल्याने ते अडचणीत सापडले आहेत. याप्रकरणी आगामी काळात नेमक्या काय घडामोडी घडतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



# वाहन खरेदी महागणार!

आधुनिक केसरी

केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्रालयाने थर्ड पार्टी विम्याच्या प्रिमियममध्ये वाढ होणार असल्यासंदर्भातील पत्रक जारी केले आहे. भारतीय बाजारपेठेमध्ये ही वाढ १ जूनपासून लागू होणार आहे. विशेष म्हणजे भारतीय विमा नियामक आणि विकास महामंडळाऐवजी (आयआरडीआय) मंत्रालयाकडून यासंदर्भातील पत्रक जारी करण्यात आले. आयआरडीआय ही देशातील विमासंदर्भातील नियमनाचे काम करते. या नव्या नियमामुळे आधीच महागाईने त्रस्त झालेल्या सर्वसामान्यांचे वाहनखरेदीचे स्वप्नापर्यंतचा प्रवासही अधिक खडतर होणार आहे. थर्ड पार्टी विम्यामध्ये वाढ झाल्याने देशातील वाहनांच्या किंमतीमध्ये वाढ होणार आहे. दुचाकी आणि चारचाकी गाड्यांच्या किंमती या निर्णयामुळे वाढणार असल्याने सर्वसामान्य ग्राहकांचा खिसा अधिक खाली होणार आहे. सध्या भारतीय वाहन उद्योगासमोर आधी मायक्रोचीपचा तुटवडा आणि कच्च्या मालाचा तुटवडा जाणवत असल्याचे अनेक प्रश्न उभे असतानाच या निर्णयामुळे वाहनखरेदी करणाऱ्या ग्राहकसंख्येवर परिणाम होण्याची भीती वाहन उद्योजकांना आहे. मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रकानुसार प्रमियम मोटरसायकच्या विम्यामध्ये १५ टक्क्यांची वाढ केली जाणार आहे. मात्र ही वाढ १५० सीसी पेक्षा अधिक इंजिन क्षमता असणाऱ्या गाड्यांना लागू होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने बजाज पल्सर, केटीएम आरसी ३९०, रॉयल एनफिल्ड बुलेट आणि याच क्षमतेच्या गाड्यांच्या समावेश होतो. मध्यम वर्गीयांसाठी चिंतेची बाब म्हणजे भारतामध्ये यापुढे कोणत्याही राज्यात दुचाकी घ्यायची असेल तर १७ टक्के अधिक रक्कम मोजावी लागणार आहे. आधीच वाहननिर्मिती कंपन्यांनी दरवाढ केली असून त्यात आता या नवीन नियमामुळे वाहने अधिक महाग होणार आहेत. खासगी गाड्यांबद्दल बोलायचे झाल्यास १००० ते १५०० सीसी क्षमतेची इंजिन असणाऱ्या गाड्यांच्या थर्डपार्टी प्रमियममध्ये सहा टक्क्यांनी वाढ होणार आहे. आधीच गाड्यांच्या किंमती वाहननिर्मिती कंपन्यांनी वाढवल्याने त्या महाग झाल्या असून त्यात आता या अतिरिक्त सहा टक्क्यांचा भार थेट ग्राहकांवर पडणार आहे.१००० सीसी इंजिन असणाऱ्या नवीन गाड्यांसाठी थर्ड पार्टी विम्याची रक्कम २३ टक्क्यांनी वाढणार आहे. तर १००० ते १५०० सीसी क्षमतेच्या इंजिनच्या गाड्यांवरील प्रिमियममध्ये ११ टक्क्यांनी वाढ होणार आहे. या वर्षाच्या सुरुवातीलाच मारुती सुझुकी, टोयोटा, महेंद्रा, टाटा या कंपन्यांनी आपल्या गाड्यांच्या किंमतींमध्ये वाढ केली. कच्च्या मालाचा पुरवठ्याला करोनामुळे फटका बसल्याने गाड्यांच्या किंमती वाढवण्यात आल्या. याचदरम्यान दुचाकी बाजारातील वाहननिर्मिती कंपन्यांनीही गाड्यांच्या किंमती वाढवल्या आहे.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# दूरदृष्टीचा नेता, विकास पुरुष : नितीन गडकरी

आधुनिक केसरी

**कोणत्याही देशाच्या विकासात रस्ते महत्वाची भूमिका बजावित असतात. रस्त्यांशिवाय विकासाची परिकल्पना करता येत नाही. परंतु भारतात कमी अवधीत रस्त्यांची परिकल्पना पूर्ण करून नितिनजी गडकरी यांनी विकासाचा मार्ग मोकळा करून नवा इतिहास स्थापित केल्याचे दिसून येते. आजच्या आधुनिक युगात देशात जे काही रस्त्यांचे जाळे व उड्डाणपूल दिसत आहे त्याचे संपूर्ण श्रेय केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनाच जाते. त्यामुळेच त्यांची प्रतिमा एक विकास पुरुष अशी बनली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेला हा आढावा.**

नितीनजी गडकरी यांना दुरदृष्टी नेताच म्हणावे लागेल. कारण रस्ते वाहतूक असो वा त्यांच्या संपर्कातील अन्य कोणतेही क्षेत्र असो त्याचा विकास नवीन टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून सोपा आणि सहज कसा करता येईल व सर्वसामान्यांना त्याचा लाभ कसा घेता येईल या पद्धतीने त्यांचे कार्य नेहमीच सुरू असते. येवढ्यातच ते थांबत नसून नवीन-नवीन परिकल्पणांचा अभ्यास करून विकासाला गती देण्याचे काम ते नेहमी करताना दिसतात. त्यांनी जी गोष्ट करण्याची ठाणली त्याला पूर्ण केल्याशिवाय ते स्वस्त बसत नाहीत. कोणत्याही देशाच्या विकासात रस्ते महत्वाची भूमिका बजावित असतात. रस्त्यांशिवाय विकासाची परिकल्पना करता येत नाही. परंतु भारतात कमी अवधीत रस्त्यांची परिकल्पना पूर्ण करून नितिनजी गडकरी यांनी विकासाचा मार्ग मोकळा करून नवा इतिहास स्थापित केल्याचे दिसून येते.आजच्या आधुनिक युगात देशात जे काही रस्त्यांचे जाळे व उड्डाणपूल दिसत आहे त्याचे संपूर्ण श्रेय केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनाच जाते. कारण रस्त्यामुळेच विकासाची दिशा ठरत असते. नितीनजी गडकरी यांच्या बुध्दीमत्तेचा व दुरदृष्टीतेचा वापर अनेक देश करीत आहेत. त्यामुळे विकासाच्या बाबतीत गडकरींचे नाव मोठ्या सन्मानाने व आदरतीथ्याने घेतले जाते. गडकरींनी जेव्हा राजकारणात पाऊल टाकले तेव्हापासूनच त्यांच्या मनात विकासाचे विकासचक्र फिरत असावे. गडकरींनी विकासाची सुरूवात महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री असतानापासून सुरू केली. यानंतर विकासाच्या बाबतीत मागे वळून कधीच पाहिले नाही. 2014 मध्ये नितीनजी गडकरी केंद्रीय मंत्री बनले तेव्हापासून आजपर्यंत देशात हजारो किलोमीटरचे महामार्ग बनवून 135 कोटी जनतेला होणारा त्रास दूर झाला, त्याचबरोबर दळणवळण, व्यापारी वाहतूकीला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली सोबतच गावागावात रोड बनवून गाव तिथे सिमेंट रोड ही संकल्पना साकार होताना दिसत आहे. यामुळे हजारो लोकांना रोजगारसुध्दा मिळाला. देशातील नवीन महामार्गामुळे हजारो किलोमीटरची वाहतूक सर्वांसाठी सुलभ झाल्याचे दिसून येते. यामुळे अनेक बाजारपेठांशी ताबडतोब संपर्क साधता येतो. गडकरींची कला अवगत करण्यासाठी विदेशातील अनेक एक्स्पर्ट त्यांच्याशी सल्लामसलत करतात. त्यामुळेच आज जगात विकासाच्या बाबतीत गडकरींचे नाव मोठ्या सन्मानाने घेतले जाते. महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केला तर महाराष्ट्राचा विकास सुवर्ण अक्षरांनी लिहावा या पध्दतीने गडकरींनी कार्य केल्याचे दिसून येते. आज नागपूरात आपल्याला मेट्रो धावतांना दिसत आहे. त्याचे संपूर्ण श्रेय माननीय गडकरींना जाते. मेट्रोमुळे लोकांना वाहतुकीची मोठी सुविधा प्राप्त झाली. संपूर्ण विदर्भात मेट्रोचे जाळे विणून विदर्भवासीयांचा प्रवास अत्यंत सुलभ होणार आहे ही विदर्भवासीयांसाठी अत्यंत आनंदाची बाब आहे. गडकरींची पुढील संकल्पा संपूर्ण भारतात मेट्रो साकार करण्याची आहे. महाराष्ट्रात उड्डानपुल व सिमेंट रोडमुळे कायापालट झाल्याचे दिसून येते. यावरून स्पष्ट होते की महाराष्ट्रासह देशाला खरा विकासाचा मार्ग दाखविला असेल तर तो नितीनजी गडकरी यांनी त्यामुळेच त्यांना आज संपूर्ण देश सन्मानाने व आदराने सलाम करतो. राज्याच्या विकासासोबत देशाचा विकास सुरू असतानाच राज्याची व देशाच्या संस्कृतीचे जतन करण्याची धुरा सांभाळण्याचे काम गडकरींनी केले. नागपूरमध्ये खासदार महोत्सवाची सुरुवात 2018 पासून झाली. त्यानिमित्याने दरवर्षी नागपूरात खासदार महोत्सव साजरा केल्या जातो. यात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.यात खास करून महाराष्ट्रासह भारतीय संस्कृतीचा वारसा पथनाट्याच्या व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवील्या जाते. या कार्यक्रमात मुख्यत्वेकरून संपूर्ण धर्मांची जोपासना आपण कशी टीकवायची याचेही हुबेहूब चित्रिकरण पहायला मिळते.यामुळे महाराष्ट्राचा वारसा दिसून येतो. नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची चालना देण्याचे काम माननीय श्री नितीनजी गडकरी यांनी खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत दाखविले आहे. पुढेही आपली संस्कृती टिकून राहावी या उद्देशाने याहीवर्षीही आपल्याला खासदार महोत्सवात पहायला मिळाले आणि आता खासदार क्रीडा महोत्सवाला सुरुवात करून खेळाडूमध्ये नवीन उर्जा निर्माण करण्याचे काम गडकरी करीत आहे. सध्याच्या परिस्थितीत भारतातील अनेक राज्यांमध्ये सांस्कृतिक वारसा लुप्त होताना दिसत आहे.परंतु विदर्भासह महाराष्ट्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सारखा पूत्र मिळाल्याने खासदार महोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतिक वारसा जिवित झाल्याचे दिसून येते. आज गडकरींच्या पुण्याईने नागपूरसह संपूर्ण भारतात उड्डाण पुलांचा बोलबाला दिसून येतो.त्यामुळेच त्यांना उडानपुलाचे प्रनेते सुध्दा म्हणतात. नागपूरच्या विकासाची गोष्ट केली तर आज नागपुरचा संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते. हीबाब संपूर्ण देश अनुभवत आहे.नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण व केंद्रबिंदू आहे. आपातकालीन परिस्थितीत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नागपूरची निवड केली जाते. त्या अनुषंगानेच नागपूरचा विकास होत असावा. विदर्भाला संतांची भूमी म्हणून सुद्धा ओळखले जाते. संत, थोर महात्म्यांच्या आचार विचारांची जपणूक हीच खरी संस्कृती होय. आज आपली संस्कृती काय आहे हे सर्वांनाच माहीत आहे. परंतु गडकरींच्या अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील संस्कृती जोपासण्याचे कार्य होत असल्याचे दिसून येते.

गडकरींनी विकासाची सुरूवात उड्डाण पूलापासुन केली ती आज विकासाच्या शिखरापर्यंत जावून ठेपली आहे आणि आता विकासासोबतच सांस्कृतीची व क्रीडा क्षेत्राची जोपासना करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारल्याचे दिसून येते. यासाठी त्यांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली आहे.भारतात अनेक ठिकाणी आपल्याला जातीय दंगली दिसून येतात.परंतु नागपूरमध्ये कोणतीच जातीय दंगल अथवा टोकाचे मतभेद व वाद झाल्याचे दिसून येत नाही. नागपूरमध्ये संघ कार्यालय, दीक्षाभूमी, ताजबाग, गणेश टेकडी, चर्च इत्यादी अनेक धर्मांची पुरातन स्थळे आहेत. त्याचे जतन सर्वधर्मीय करतात. गडकरी यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांना घेऊन चालने व समाजामध्ये सर्वच धर्माविषयी आदराची भावना निर्माण करून सर्वांना एकसुत्रीत बांधून ठेवण्याचे महत्वाचे काम गडकरींनी केले आणि करीत आहेत. खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून समाज कार्यासह लोकांनी आपल्या संस्कृतीचे जतन कसे करता येईल याची जाणीव करून देण्याचे कार्य गडकरी करीत आहे. नागपूरला राजकीय दृष्ट्या संघभूमी म्हणून भारतासह जगभर ओळखले जाते. परंतु आजही नागपूरमधील हिंदू-मुस्लिम-शिख-ईसाइ-बौध्द एकोप्याने राहतात. ही नागपूरसाठी व नागपूरकरांसाठी सन्मानाची बाब आहे. गडकरी नागपूरचे खासदार झाले म्हणूनच विकास झाला आणि त्यांच्यामुळेच संस्कृतीचे जतन कसे करावे याची शिकवण खासदार महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना मिळत असते. आज गडकरींच्या कामाची शैली व एकाग्रता लक्षात घेता ते भारतासाठी "विकासपुरुष"आहे. खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव पुनर्जीवीत करण्याचे काम करीत आहे.





# त्यागमूर्ती : माता रमाई आंबेडकर

आधुनिक केसरी

**१९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खूप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला, मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानव बाबासाहेब आंबेडकर यांना धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेली अशा या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!**

आज २७ मे, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची पुण्यतिथी. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे (वलंगकर) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई-वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मनाशी हितगूज करणारा : 'काव्यकस्तुरी'




आधुनिक केसरी

**काव्यकस्तुरीचे मुखपृष्ठ आणि रंगसंगतीने माझे कलासक्त मन लगेच वेधून घेतले. कवी गिरीश जोशी यांचा हा पहिलाच काव्यसंग्रह असला तरी अवघड मानला जाणारा, विशिष्ट मात्रांमध्ये बांधलेला 'गझल' हा काव्यप्रकारही त्यांनी या संग्रहात अतिशय सहजतेने हाताळला आहे. स्त्रीवादी, कृषीसंस्कृतीवर भाष्य करणारी, विविध सामाजिक प्रश्नांना अधोरेखित करणारी, निसर्गसख्य जपणारी, देशाभिमान जागृत करणारी, प्रेमतुषारांत चिंब भिजवणारी आणि बालमनाचा कप्पा हळूच उघडणारी कविता आपल्याशी या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून हितगुज करते.**

मराठी राजभाषा दिनाच्या शुभमुहूर्तावर नगर येथे झालेल्या ATM च्या शिक्षक साहित्य संमेलनात कवीकट्ट्याच्या निमित्ताने अगदी शेवटपर्यंत थांबलेल्या दर्दी कवींपैकी एक कवी-गझलकार गिरीशदादा. निरोप घेताना माझ्या मागणीवरून जपून ठेवलेली त्याची काव्यकस्तुरी या काव्यसंग्रहाची शेवटची प्रत माझ्याकडे सहर्ष सुपूर्द करून कस्तुरीसह त्याने परतीच्या प्रवासासाठी निरोप घेतला.
ATM च्या ऑनलाईन कार्यक्रमात मी या उभयतांच्या गाणी आणि कवितांच्या बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले असल्याने गिरीश आणि कस्तुरी यांच्या जबरदस्त अनुबंधाची अनुभूती मी घेतलेली होती. त्यामुळे या काव्यसंग्रहातील कविता मी कधी एकदा वाचतेय असे झाले होते.

खरंतर मी स्वतः कविता रचत असले तरी मी आधी वाचक आहे. वयाच्या पाचव्या-सहाव्या वयापासून ते वयाच्या चौतीसाव्या वयापर्यंत प्रदीर्घ वेळ वाचन केल्यानंतर मी लिहू लागले. त्यामुळे 'वाचन' हे माझं पहिलं प्रेम. म्हणून मग सुट्टीतील अनेक नियोजीत कामांतून थोडी निवांत झाले आणि लगेच 'काव्यकस्तुरी' हातात घेतली. जसजशी एकेक कविता वाचत गेले तसतसा यातील मधुमय काव्यगंध मनतरंग छेडून गेला.

काव्यकस्तुरीचे मुखपृष्ठ आणि रंगसंगतीने माझे कलासक्त मन लगेच वेधून घेतले. कवी गिरीश जोशी यांचा हा पहिलाच काव्यसंग्रह असला तरी अवघड मानला जाणारा, विशिष्ट मात्रांमध्ये बांधलेला 'गझल' हा काव्यप्रकारही त्यांनी या संग्रहात अतिशय सहजतेने हाताळला आहे.

स्त्रीवादी, कृषीसंस्कृतीवर भाष्य करणारी, विविध सामाजिक प्रश्नांना अधोरेखित करणारी, निसर्गसख्य जपणारी, देशाभिमान जागृत करणारी, प्रेमतुषारांत चिंब भिजवणारी आणि बालमनाचा कप्पा हळूच उघडणारी कविता आपल्याशी या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून हितगुज करते.

"गारपीट वावरात, सारं रान झालं गार,
बळीराजाच्या डोईला लई करजाचा भार
का कोपला रं मेघा, मेली गुरं अन् गाय,
यड्या-पिशा पावसानं लुटली रं धरणीमाय"

या ओळींतून कवीचे बळीराजाच्या भावनांशी तादात्म्य पावलेले जखमी हृदय उलगडत जाते आणि पावसाच्या क्रूर रूपाचे दर्शन वाचकांना घडते. पावसाची अनेकविध रुपांना कवीने आपल्या कवितेत कैद केले आहे. पुढील ओळी सखीला बेभान करणाऱ्या खट्याळ पावसाचे रूप दाखवतात.

"पाऊस येता ती बावरते, वेड तिला लागते
गुपीत मनाचे दवबिंदुना गझल खुळी सांगते"

किंवा

"अगदी तुझ्यासारखाच बेभान झाला होता,
स्वप्नात माझ्या काल पाऊस आला होता"

पावसाची विविध रूपे शब्दमालेत गुंफतानाच कवीचे समाजभान जागे असल्याचाही प्रत्यय पुढील ओळींतून येतो.

"माझी अमुक जात आहे, तुमची तमुक जात
आहे
जात केवळ माणसांच्या एकात्मतेचा घात
आहे"

वरील ओळींतून कवी गिरीश जातीभेदावर भाष्य करतात आणि त्याचवेळी अंतर्मनाला साद घालणारा आणि सामाजिक भान जागृत करणारा प्रश्नही ते वाचकांना विचारतात .

"सगळे जसे जगतात, तसंच जगत राहायचं
का?
डोळे मिटून घडणारं सारंच बघत राहायचं
का?"

निसर्गसख्य जपणारी वर्णनपर कविता पुढील ओळींतून आपल्या भेटला येते.

"ढगांचा गडगडाट, झऱ्यांचा खळखळाट
धबधब्यांनी नाहलेला, हिरवागार डोंगरघाट
पावसाळी मोत्यांनी सजली, वसुंधरेची कोमल
तनू
श्रावणसरी बरसल्या मेघांचे बाण जणू"

एका ठिकाणी मात्र कवीमनातील संस्कारक्षम शिक्षक जागृत होऊन बालकांना फलाहाराचे महत्वच जणू पटवून देत आहे.

"नारळातले पाणी निर्मळ हवेहवेसे मज वाटे,
आतून असती गोड गरे पण फणसावरती बहु
काटे"

अनेक विषय हाताळताना कवी देशापुढील आव्हाने कवितेतून उद्धृत करतो.

"हातात शस्त्र होते, ब्रिटिशांवरी निशाणा
यत्नांसवे लढूया, हा भारतीय बाणा
गेलेत स्वर्गलोकी, ते वीर झुंजलेले
सुटलेत अजून कोठे, ते प्रश्न मांडलेले"

काही ओळी कवी गिरीश यांच्या संस्कारातील स्त्रीशक्तीविषयीचा आदर अधोरेखित करतात.

"तू सत्यता, सामर्थ्यता, विश्वास तू, तू शुद्धता
वर्षा ऋतू तू, तूच वसंत, तू या मनाची
शांतता"

सोबत प्रेरणेचं बळ द्यायलाही विसरत नाहीत.

"एकटी आहे जरी तू, प्रयत्नांना घे सवे
धीर दे आता
स्वतःला, मोजू नको
तू आसवे"



'संवेदनशीलता' ही तर कवी-कवयित्रींची जन्मदात्री. कवी गिरीश यांची कविताही याला अपवाद कशी असेल.

"नयनात साठलेले अश्रू विरून गेले,
सांगू कसे कुणाला गाणे मरून गेले"

ही सल जरी असली तरी कवीचे हृदय प्रेमभावनेने काठोकाठ भरलेले असून आपल्या प्रियतम सखीला व्यक्त होण्यास उदयुक्त करताना ते लिहितात.

"मला चंदेरी कागद समज, रेखाट तव
कल्पनांच्या रेषा,
तुझ्या प्रेमाची अशीही असू दे, एक तरल
भाषा"

प्रेमात स्वतःकडे कमीपणा घेत प्रियतमेला थोरपण देताना कवी म्हणतो.

"मी किनारा लहानसा, सागर तू होशील का?
ओसांडणाऱ्या लाटा होऊन, आलिंगन मज
देशील का?"

पण कधीतरी प्रिय सखीनेही प्रीतपाखरू होऊन कवीस साद घालावी ही सुप्त ईच्छा पुढील ओळींतून डोकावतेच.

"जाते जाते म्हणण्याची तुझी जुनी खोड,
मीच नेहमी थांबवावं याचीच तुला ओढ . .
मला थांबविण्याचा तुझा बेत अजून ठरला
नाही,
ए थांब ना सखे जराशी जीव अजून भरला
नाही"

प्रियतम सखीला जीवनाचा केंद्रबिंदू म्हणण्याची कवीची तरल प्रीत वाचकांच्या हृदयाच्या तारा हलकेच छेडून जाते आणि प्रत्येकाला स्वतःचा चंद्र आठवण्यास भाग पाडते.

"अंधार जाहला अन् तू चांद प्रकाशाचा,
तू केंद्रबिंदू सखे या हृदय आकाशाचा"

सुंदर आयुष्याच्या अशा अनेकविध रंगांमध्ये न्हालेलं कवीमन शेवटी मात्र सर्व मानवजातीला मित्रत्वाच्या नात्याने एक आवाहन करतं . . जीवन अतीव सुंदर तर आहेच पण त्याचं सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी एक माणूस म्हणून आपण कसं वागावं हे काव्यात्म पद्धतीने सांगताना कवी गिरीश म्हणतात.

"हे पाऊल प्रगतीचे खेचू नये,
पुण्य जरी केले ना, पापही मग वेचू नये . .
ठेव जाणीव हृदयी मित्रा सदैव माणुसकीची,
कधी सोडशील कास मित्रा खेकडा
प्रवृत्तीची"

अशा अनेकानेक सुंदर, सरस, सुकुमार, सुगंधीत काव्यसुमांची पखरण 'काव्यकस्तुरी' या काव्यसंग्रहात कवी गिरीश जोशी यांनी केली आहे. सुज्ञ वाचकांनी हा अनमोल काव्यसंग्रह संग्रही ठेवावाच. शुल्क फक्त ८०/- रु असून पूर्ण रसग्रहण केल्याशिवाय तुम्ही तो खाली ठेवणार नाही इतका तो मनोवेधक आहे. कस्तुरीगंधाच्या मागे धावणाऱ्या बेभान हरणासम वाचकांची स्थिती होणार यात शंका नाही.

कवी गिरीश जोशी आणि त्यांची जीवनसखी कस्तुरी या उभयतांना त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस अनेकोत्तम शुभेच्छा देते आणि माझ्या शब्दमालेला पूर्णविराम देते.

**पुस्तक परीक्षण**

**सौ. स्नेहल संजीव भोर**
संपर्क क्र. 8605802620

# अनोख्या प्रपोजलची अनोखी लव्ह स्टोरी




आधुनिक केसरी

संपूर्ण विश्वाची शक्ती संचारलेल्या अडीच अक्षरी शब्दामुळे प्रत्येकाचं अंग शहारलं जातं. एक हुरुप व नवचैतन्य निर्माण होतं. ती चाहूल न जाणता प्रत्येकाच्या मनाला हवीहवीशी वाटते. ती वेगळी दुनिया आपलीशी वाटायला लागते. त्यामुळे प्रेम या अडीच अक्षरी शब्दाच्या जाळ्यात कळत नकळत का होईना प्रत्येकजण कधी ना कधी गुंतत जातो. या जाळ्यातून सुटका करायची म्हटलं तर तारेवरची कसरतच असते. असंच काहीसं कोल्हापूरातील सौरभ कसबेकर आणि सांगलीमधील उत्कर्षा यांच्या बाबतीत घडलं.

कोल्हापूर येथे सगळेच विषय एकदम हार्ड असतात. मग, त्या शर्यती असो वा मारामारी. मग कोल्हापूरकर प्रेमात कसं मागं राहतील? लग्नासाठी प्रपोज करण्याच्या आजपर्यंत अनेक पद्धती आपण पाहिल्या आहेत. मात्र कोल्हापुरातल्या एका तरुणाने भल्या मोठ्या होर्डिंगद्वारे त्याच्या प्रेयसीला प्रपोज केलं आहे आणि त्या मुलीने सुद्धा त्याला होकार दिल्याची घटना घडली आहे. एवढंच काय तर मुलीच्या आणि मुलाच्या घरचे सर्वजण तयार सुध्दा झाले आहेत. या अनोख्या लव्ह स्टोरीच्या या होर्डिंगची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे.

मुलाने आपल्याला अशा पद्धतीने प्रपोज करावं की याआधी कुणी तसं केलंच नसेल, अशी इच्छा अनेक मुली बोलून दाखवतात. तसा प्रयत्नही अनेकजण करतात. त्यामध्ये काही अनोख्या पद्धतीने केलेले प्रपोज अनेकांच्या लक्षात राहतात. अशाच अनोख्या पद्धतीने कोल्हापुरातल्या सौरभ कसबेकरने उत्कर्षा हीला चक्क मोठं होर्डिंग लाऊन प्रपोज केलं आहे. महत्त्वाचं म्हणजे त्या मुलीने सुद्धा त्याला होकार दिला आहे. एव्हढंच काय तर सुरुवातीला नकारघंटा वाजविलेल्या त्या मुलीच्या घरचे सर्वजणसुद्धा यांच्या नात्यासाठी तयार झाले आहेत.

कोल्हापुरातील सौरभ कसबेकर आणि सांगलीमधील मुलगी उत्कर्षा दोघेही बुधगाव-सांगली येथील वसंतरावदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सिव्हिल डिपार्टमेंटमधून शिक्षण घेत होते. सौरभची आणि उत्कर्षाची शेवटच्या वर्षापर्यंत सुद्धा काही खास ओळख नव्हती. मात्र, जेव्हा इंजिनिअरिंग पूर्ण झाले, तेव्हा सौरभच्या घरच्यांनी त्याला त्याच्या मनात कोणी असेल तर सांग आम्ही रीतसर मागणी घालू असं त्याला सांगितलं.

मग या पठ्ठ्याने तात्काळ कॉलेजमधील उत्कर्षा नावाची मुलगी होती आणि ती त्याला आवडायची असं सांगितलं. त्यामुळे त्यांनी रीतसर तिच्या घरी लग्नासाठी मागणी घालायचे ठरवले. नंतर ठरल्याप्रमाणे सौरभच्या वडिलांनी उत्कर्षाच्या घरी मागणी घातली. उत्कर्षाच्या घरच्यांचे सुद्धा काही दिवस होय नाही, होय नाही हेच सुरू होते. उत्कर्षाकडूनसुद्धा अद्याप होकार आला नव्हता. अनेक प्रयत्नानंतर शेवटी घरचेसुद्धा तयार झाले. मात्र लग्नासाठी अनोख्या पद्धतीने तिला प्रपोज करायचे असे सौरभने ठरवले होते. त्यानुसार त्याने कोल्हापूर-सांगली रोड वर एका होर्डिंगद्वारे प्रपोज करायचे ठरवले. या नियोजनानुसार सौरभने चक्क हायवेच्या शेजारीच भलंमोठं होर्डिंग लावलं आणि उत्कर्षाला प्रपोज केलं.

या होर्डिंगचे आणि सौरभ-उत्कर्षाचे प्रपोज करतानाचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. त्याच्या या अनोख्या प्रपोजची चर्चा सर्वत्र रंगली असून अनेक प्रेमवीरांनाही नवीन आयडीया मिळाली आहे. येत्या २७ मेला त्यांचे लग्न ठरवण्यात आले आहे. त्यामुळे ते दोघेही खूप आनंदी असल्याचे म्हटले आहे. नांदा सौख्यभरे असे म्हणत संपूर्ण कोल्हापूरकर त्यांना शुभेच्छा देत आहेत.

**-सुनील शिरपुरे,** यवतमाळ, मो. ७०५७१८५४७९

# प्रा. डॉ. उमराव कावळे : अधुरी एक कहाणी...

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरू पुढे)**

घरचा डबा आणि पाण्याची बाटली कायमच सोबत असायची. महाविद्यालयात ते एकटेच जेवत. स्कुटीच्या डिक्कीत पाण्याची बाटली असायची. या काळात गरम जेवण, स्नानगृह, शौचालय इत्यादींची कमालीची स्वच्छता पत्नी - गंगासागरताईंनी जीव ओतून केली. डॉ. उमराव गेले तेव्हा त्यांचा आक्रोश काळजाला हादरवून सोडणारा होता. 'सर नुसते खुर्चीत बसून राहिले असते तर जलमभर सांभाळले असते...' हा संवाद त्यांच्या त्यागाचे, समर्पणवृत्तीचे प्रतीक आहे.

आत्मविश्वास हा डॉ. उमराव यांचा स्थायीभाव होता. किडणीच्या शस्त्रक्रियेला ते अत्यंत आत्मविश्वासाने सामोरे गेले. तोच आत्मविश्वास त्यांच्या पीएच.डी. संशोधन कार्यात होता. किडणीच्या आजारातून सावरल्यानंतर ते वर्षभरातच पीएच.डी. संशोधनकार्यात रमले. फारसे संदर्भग्रंथ उपलब्ध नसलेला आणि स्वतःची आस्था असलेला सालदारांच्या सामाजिक जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास हा जिव्हाळ्याचा विषय घेऊन डॉ.स्वाती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएच.डी.ही अत्यंत सन्मानाची पदवी प्राप्त केली. या शोधप्रबंधात त्यांनी स्वतःची मते, चिंतन अत्यंत अभ्यासूपणे मांडले आहे. ही बाब जेव्हा त्यांची किडणी शस्त्रक्रिया करणारे डॉ. सुहास बावीकर यांना समजली तेव्हा ते अत्यंत आनंदित झाले. आहार - विहाराच्या अनेक मर्यादा असूनही या कौतुकास्पद कामगिरीबद्दल डॉ. बावीकर साहेबांनी औरंगाबादला त्यांचा विशेष सत्कार केला. कोणतेही कार्य हाती घेतल्यानंतर ते नियोजनाने व उत्तमपणे पार पाडण्याची त्यांची खासियत होती.

कोरोना महामारीने जगाला नियंत्रित केले होते. मानवी जीवनातील सर्व व्यवहार जवळपास ठप्प झाले होते. आपल्याच स्पर्शावर, श्वासांवर आपलाच विश्वास उरला नव्हता. कोरोना काळाने जगण्यात कमालीची अस्वस्थता निर्माण केली होती. मार्च २०२० ला कोरोनाची पहिली लाट आली.त्यानंतर मार्च २०२१ ला दुसरी लाट आली. यामध्ये आपल्या सहवासातील जीवाभावाची माणसे जात होती. भ्रमणध्वनी उघडताना हात थरथरत होते, मन भीतीने कापत होते. उमराव यांना मे २०२१ मध्ये कोरोनाची लागण झाली. सुरुवातीला



औरंगाबाद त्यानंतर हैदराबादला हलविले. त्यांच्या प्रकृतीत चढउतार होत होते. या काळात अनेक मित्र, नातेवाइकांनी तन-मन-धनाने त्यांना साथ दिली. या भयग्रस्त काळात भाचा - सोपान, पुतण्या - रामेश्वर, मेव्हुणा - ज्ञानेश्वर यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून सेवेचे कर्तव्य पार पाडले. त्यांची प्रकृती सुधारत असताना नंतर खालावत गेली. काळाच्या पोटात काय दडले आहे व नियतीला काय मान्य आहे, हे सांगता येत नाही. २६ मे २०२१ रोजी सकाळी डॉ. काशीनाथ चव्हाण यांचा फोन आला आणि 'उमराव गेले...' ही अत्यंत अप्रिय बातमी कानावर आदळली. आठवणीच्या अनेक मुंग्या मेंदूला तोडत होत्या. अनेक आठवणींचा पट डोळ्यांसमोरून सरकत होता. प्राचार्यसोबत शेतीशास्त्रावर चर्चा करणारे,बाळासाहेब भोसले यांच्या शेजारी बसून व्यवहाराच्या गप्पा मारणारे, डॉ. गौतम कांबळे यांच्यासोबत थट्टामस्करी करणारे,डॉ. संदीप गोरे यांच्यासोबत विभागाबाबत हितगुज करणारे, सर्व सहकाऱ्यांसोबत अत्यंत नितळपणे वागणारे, महाविद्यालयाच्या प्रांगणात झाडाखाली बसून एकटेच जेवणारे, दूर अंतरावरील स्कुटीजवळ जाऊन पाणी पिणारे आणि सर्वांशी मित्रत्वाचे आणि माणुसकीचे नाते ठेवणारे उमराव आता कधीच भेटणार नाहीत, ही कल्पनाच मनाला अस्वस्थ करून गेली आहे. काही माणसं आपल्या विचार, वर्तनातून समाजाच्या मनात घर करत असतात. उमराव तुम्हीही आमच्या मनात घर केले आहे. आता तुम्ही नाहीत या विचाराने मनाचा तळडोह ढवळून निघतो.

डॉ. उमराव अवघ्या पंचेचाळीस वर्षांत तुम्ही जगाचा निरोप घेतलात. तुम्ही आपल्या मुलांविषयी किती स्वप्न पाहत होतात,कुटुंबाला एखाद्या शिल्पकाराप्रमाणे घडवीत होतात. प्रवास सहन होत नसतानाही नांदेडला घर केलात. चार-पाच वर्षात सर्व मार्गी लागले की पुन्हा वसमतला जायचे, आपला सुखीदुखी जीव असेही म्हणत राहिलात. अन अर्ध्यावरच डाव मोडून निघून गेलात. हैदराबादला गेल्यावर मला भूक लागली आहे, मला ऍडमिट करा,असे बोलत राहिलात. खरोखरच मृत्यू आपल्या किती जवळ

रेंगाळत असतो ; परंतु त्याची पुसटशीही जाणीवही माणसाला नसते. आता तुमच्याशिवाय पत्नी,मुले तुमचे कुटुंब जगत आहे. जगणे हा धर्म असतो. पुढे जावंच लागतं... जगण्याला थांबविता येत नाही, हेच खरे. आपले कुटुंब दुःख आणि विरहाच्या तीव्र झळा अनुभवत आहे. दिवस कायमच मुक्कामाला राहत नसतात. गंगाधरदादा, सासरे - कोंडबाराव बोखारे आधाराला आहेतच. छत्र गेलेल्या माणसांना सावली हवी असते आपुलकीची, माणुसकीची. आपण जमेल त्या पद्धतीने सावलीच्या बिया टोबूयात... लवकरच हिरवेगार वृक्ष येतील कायमची सावली घेऊन.

# कष्टकरी बांधवांच्या मनात घर केल्यानेच श्रमदानातून उभारले कार्यकर्त्यांचे घर

## प्रा.प्रतिभा अहिरे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कष्टकरी बांधवांसाठी संघर्षरत मधुकर खिल्लारे व वसुधा कल्याणकर यांचे घर कामगारांनी श्रमदानातून उभे केले. कष्टकऱ्यांच्या मनात घर केल्यानेच हे घर उभे राहिले आहे, असे प्रतिपादन कवियत्री प्रा.प्रतिभा अहिरे यांनी केले. विश्रांती नगर या वंचित वसाहतीतील कामगारांच्या, नागरिकांच्या प्रश्नांवर भाकपचे कार्यकर्ते मधुकर खिल्लारे व वसुधा कल्याणकर हे दाम्पत्य लढत असते. रस्त्यावर संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यालाही घर असावे असा विचार कामगारांनी केला. या कामगारांनी श्रमदान करून खिल्लारे यांचे घर बांधून दिले. या आगळ्यावेगळ्या ग्रुहसाफल्य सोहळ्यात श्रमदान करणाऱ्या कामगारांचा सत्कार संविधान देऊन करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा.अहिरे बोलत होत्या.
यावेळी बोलताना म्हणाल्या की, कष्टकऱ्यांशी जैविक बांधिलकी ठेवल्यानेच कष्टकरी बांधवांनी लढाऊ कार्यकर्त्यांचे घर उभे केले आहे.वसुधा व मधुकर हे माणसांना जोडणारे सिमेंट आहेत. चळवळीला व्यावहारिक, ईव्हेंटचे स्वरूप आलेले असताना हा परिवार निस्वार्थी व्रुत्तीने संघर्ष करतो याची प्रचिती आल्यानेच हे घर ऊभे राहिले आहे. या घरात समाजाचा संसार फुलतो आहे.



म्हणून हा ग्रुहसाफल्य सोहळा अपवादात्मक, सुखात्मक आहे.

यावेळी त्यांनी काही कविताही सादर केल्या. यावेळी माकपचे प्रा.राम बाहेती यांनी या दाम्पत्याच्या कार्याचा आढावा घेतला.
अध्यक्षस्थानी सहाय्यक कामगार आयुक्त युवराज पडियाल होते. ते म्हणाले कामगार आणि कार्यकर्ते यांच्या प्रेमाचे प्रतिक हे घर ठरले आहे. यावेळी ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते बुध्दीनाथ बराळ यांनी देशात कामगारांच्या हक्कांची पायमल्ली होत असल्याची खंत व्यक्त केली. प्रा.भारती गोरे यांनी शुभेच्छा दिल्या.
रूपचंद ढवळनपुरे, संजय अंभोरे, राजेश म्हस्के, किशोर राईकवार, विठ्ठल रंधवे, सोमनाथ बावस्कर, विजय बहादूर यादव, विनोद पाठक, विकास आगळे, रोहिदास घुले, या कामगारांचा शाल व संविधान प्रत देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक कॉ.मधुकर खिल्लारे यांनी केले. याप्रसंगी कॉ.भीमराव बन्सोड, प्रल्हाद पोटे, प्रा. भारत शिरसाट, डॉ. रेखा मेश्राम, डॉ. सचिन कोलते, MKCL चे मराठवाडा व्यवस्थापक डॉ. दिपक पटेकर, निलेश झाल्टे, प्रल्हाद पोटे, अभय टाकसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.
आभार दलित अधिकार आंदोलनाचे जिल्हा अध्यक्ष कॉ.भास्कर लहाने यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेश ठोंबरे, अजय चव्हाण, संदीप बुवा, छगन तुपे, प्रेमनाथ दांडगे, विशाल नरवडे, विमल धनई, शीतल धनई, नवसाजी हणमंते, वैष्णवी मानकरी, बालाजी बुधवंत, अदिती झोडपे, शांता सुर्यवंशी, साक्षी सोनवणे, प्रमिला मानकरी यांनी परिश्रम घेतले.

# बनावट खरेदीखत तयार करून फसवणूक केल्याचा आरोपातून निर्दोष मुक्तता

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** शहरातील शिवाजी चौक येथील नगर परिषद कॉम्प्लेक्स मधील गाळा नावे करण्यासाठी बनावट खरेदीखत व शपथपत्र तयार करून, ते नगर परिषद कार्यालयात सादर करून नगर परिषदेची व फिर्यादीची फसवणूक केल्याबाबत फिर्यादी अनंतराव कुलकर्णी यांच्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी अनंत कुलकर्णी यांच्या तक्रारीनुसार त्यांनी बाबुलाल लखेरा यांचेकडून न.प. मालकीचा गाळा करारनाम्या आधारे खरेदी केला होता. परंतु आरोपींनी 1997 साली दुकानाचे कुलूप तोडून सदर गाळ्याचा बेकायदेशीर ताबा घेतला. त्यानंतर बाबुलाल लखेरा हे दि.16/09/1992 रोजी मयत झाले असताना आरोपी शेख रईस शेख युसुफ व त्याची पत्नी आयेशाबेगम शेख रईस यांनी दि.1/04/1997 रोजी खरेदीखत क्र.1267/1997 नुसार खोटे-बनावट खरेदीखत व शपथपत्र तयार करून त्याआधारे नगर परिषदेचा गाळा नावावर



करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे फिर्यादीची व नगर परिषदेची फसवणूक झाली आशा तक्रारीवरून उपरोक्त गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास करून पो.उ.नि. बी.डी. बोरसे यांनी न्यायालयात आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र सादर केले. सदर प्रकरणाची सुनावणी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अंबाजोगाई यांचे समक्ष झाली.
सरकार पक्षातर्फे फिर्यादी, तपास अधिकारी, तात्कालीन नगर परिषद मुख्याधिकारी, अधीक्षक यांच्यासह इतर एकूण 7 साक्षीदार तपासण्यात आले. सदर प्रकरणाची सुनावणी पूर्ण होवुन अभिलेखावरील साक्षपुरावा व आरोपींचे विधीज्ञ ॲड. प्रदिप पुरुषोत्तमराव दहिवाळ यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरून प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अंबाजोगाई ओ.ए. साने यांनी सबळ पुराव्याअभावी सदर आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

# भगवंताचे नामस्मरण करतो त्याचा देह पवित्र असतो : प्रा.बाळासाहेब देहूकर महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** वाशी येथे देहूकर संप्रदायाचा हरिनाम सप्ताह सोहळा दि.23 मे रोजीपासून सुरू झाला असून दररोज सकाळी काकड आरती, भजन, प्रवचन व सायंकाळी किर्तनाचा लाभ होत आहे. दि.२५ मे ह.भ.प.बाळासाहेब ज्ञानेश्वर माऊली देहूकर महाराज यांचे सुश्राव्य किर्तन झाले. यादिवशी मुक्ताबाई अंतर धाम म्हणून संत मुक्ताबाई गुरूप्रदिन सोहळा साजरा करण्यात येतो. अंतरधाम पावल्या होत्या त्या ७२५ वर्षे झाली. आजचा दिवस म्हणजे शतकोत्तर अमृत महोत्सव आहे. हा योगायोग आहे. स्त्री शक्ती म्हणजे आदीशक्ती सोहळा आहे. स्त्री शक्ती कार्यप्रवृत्त करीत असते. मुक्ताबाईचे अगाध ज्ञान होते. त्यांनी ज्ञानेश्वर माऊलीला ताटी उघडा ज्ञानेश्वरा म्हणून त्यांना निराशापासून परावृत्त केले तसेच चांगदेव महाराज महान तपस्वी असताना त्यांनी सिंहावरबसून अहंकार दाखविण्याचा प्रयत्न केला तर मुक्ताबाईने ज्ञानेश्वराला निर्जीव भिंत चालवून चांगदेवांचा अहंकार नष्ट केला. तसेच अनेक



संतांचे मेळाव्यात डोक्यावर थापटी मारून नामदेव महाराजांचा अहंकार नष्ट करून त्यांना गुरु करण्यास भाग पाडले असे सांगून शेवटी म्हणाले की, जो मनुष्य भगवंताचे नामस्मरण करतो त्याचा देह पवित्र असतो, असे शेवटी ह.भ.प.बाळासाहेब ज्ञानेश्वर माऊली देहूकर महाराज म्हणाले.
किर्तनाच्या सुरुवातीस येथील जेष्ठ नागरिक संघटनेतर्फे अध्यक्ष हरून काझी, सचिव बळीराम जगताप व भाऊसाहेब घुमरे यांनी बाळासाहेब महाराज यांच्या हस्ते श्रीमती प्रमिला महामुनी व किशाबाई कपाळे यांचा महाराजांचे हस्ते शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ व फोटो देऊन सत्कार करण्यात आला.



# माती परीक्षण करुनच पेरणी करा : संगीता पवार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील किन्ही येथे एसएचएम या योनेअंतर्गत माती परीक्षणा करीता माती नमुना कसा घ्यावा, माती परीक्षणाचे फायदे याचे मार्गदर्शन करण्यात आले. सोयगाव तालुका कृषी अधिकारी संगीता पवार, मंडळ कृषी अधिकारी वाघ (बनोटी मंडळ), सावळदबारा कृषी सहाय्यक मानसिंग भोळे, कृषी सहाय्यक अर्जुन सुरडकर व कृषी पर्यवेक्षक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.२५ रोजी झाले.
मौजे किन्ही येथे एस.एच.एम.या योनेअंतर्गत माती परीक्षणा करीता माती नमुना कसा घ्यावा, माती परीक्षणाचे फायदे, तसेच खरीप हंगाम 2022 च्या अनुषंगाने तुणधान्य/कडधान्य पिकांचे बियाणे पेरणी करतेवेळी त्या बियाण्यास बीजप्रक्रिया कशा प्रकारे करावी तसेच बीजप्रक्रियेचे फायदे याबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन कृषी सहायक जयश्री वाघ यांनी केले. यावेळी गावांतील सरपंच, उपसरपंच व इतर शेतकरी मंडळी या प्रशिक्षणास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महेबुबनगरमधील पाण्यासाठी जीवन प्राधिकरणने घेतली दखल; तीन महिन्यात पाईपलाइन

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** शहरातील महेबुबनगर भागातील नागरिकांची गेल्या दोन वर्षांपासून पिण्याच्या पाण्यावाचून ससेहोलपट होत होती.
या जीवनावश्यक समस्येची सोडवणुक करण्यात यावी यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे माजलगाव शहराध्यक्ष मुश्ताक कुरेशी यांनी भागातील नागरिकांसह वेगवेगळया प्रकारची आंदोलने करुन तहसिलदार ते विभागीय आयुक्तांना निवेदने देण्यात आली होती. पण ९ नोव्हेंबर २०२१ला जवळपास एका वर्षा करीता नगराध्यक्षपदी विराजमान झालेले नगराध्यक्ष शेख मंजुर यांनी हा भाग मुस्लिम बहुल वस्ती असतानाही त्यांच्या समस्याचे खिल्ली उडवली होती आणि देखेंगे, अगले महिने में नई पाईप लाईन डालेंगे, हालाकी यह भाग न.प. के कार्यक्षेत्र में आता नही. अश्या चर्चा आंदोलनकर्त्यांसोबत केल्या होत्या. त्यामुळे मुख्याधिकरी विशाल भोसले यांनी ही हाच धागा पकडून जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांच्या आलेला पत्रांना उत्तरे देताना सांगितले होते की, न.प.सभागृहाने ठराव पारीत केला आणि त्यावर निधी खर्च करावा अशी तरतूद केल्यास पाण्याची व्यवस्था करण्यासाठी प्रयत्न केला जाईल. पण मंजुर यांचा कार्यकाळ चार महिन्यांपुर्वी संपला तर मुख्याधिकारी विशाल भोसले शहरातील ईदगाह मैदानातील स्वछता गरज नसतानाही स्वच्छता निविदा धारकाशी संगनमत करून त्यांच्या भावाच्या जेसीबीला आर्थिक फायदा झाला पाहिजे म्हणून २८ एप्रिल गुरुवार रोजी त्या भागातील एका ९ वर्षीय मुलीचा अंगावर भिंत कोसळल्याने मृत्यू झाला होता. यावर जेसीबी चालकासह मालक, मुख्याधिकारी व इतर दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.
भोसलेंचा न.प.शी सबंध राहिला नाही. याचा उहापोह करण्याचा उद्देश म्हणजे नागरिकांच्या स्मरणशक्तीला उजाळा देण्यासाठी. असो पण मुश्ताक कुरेशी या युवकाच्या चिकाटीने व विभागीय आयुक्त सुनिल केंद्रेकर यांच्या कर्तव्य दक्षतेन २६ मे गुरुवार रोजी जीवन प्राधिकरण केंद्र, मुंबई यांच्या अभियंत्यांनी सदर भागातील नागरिकांची समस्या जाणुन घेतली आहे आणि स्थळाची पाहणी करून लागणाऱ्या आवश्यक पाईप लाइनचा प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर करण्याचे आश्वासन दिले आणि मंजुरी मिळाली तर दोन-तीन महिन्यात पाईप लाइन कार्यान्वीत होणार असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीला मुश्ताक कुरेशी यांनी दिली आहे.

# ऋण समाधान योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळेना

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** थकित पिककर्ज नियमीत करण्यासाठी ऋण समाधान योजना बँकेने राबविली परंतु येथील एसबीआय बँकेच्या शाखेत या योजनेत अधिकाऱ्यांकडून गोंधळ केला जात आहे. त्यामुळे या योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळत नसुन अनेक शेतकऱ्यांच्या बँकेकडे तक्रारी देउनही दुर्लक्ष होत असल्याचा प्रकार येथील एसबीआय शाखेत होत असल्याचा आरोप शेतकरी अविनाश कांडुरे यांनी केला आहे.
शहरातील हनुमान चौकातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखा व्यवस्थापकास अविनाश कांडुरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, थकीत असलेल्या पिककर्जा संदर्भात बँकेने सांगितल्याप्रमाणे 10 टक्के ऋण समाधान योजनेअंतर्गत पैसे भरून कर्जमाफीचा लाभ घ्यावा असा मॅसेज आल्यानंतर त्यांनी 19/01/2021 रोजी 38 हजार 300 रूपये भरले. त्यानुसार सदरील पैसे बँकेने कांडुरे यांच्या पिककर्ज खात्यावर वर्ग केले व काही दिवसानंतर तुम्हाला कर्ज खात्यावरील बोजा कमी करून बेबाकी प्रमाणपत्र देण्यात येईल, असे सांगितले परंतु एक ते दिड वर्षे झाले पैसे भरून तरी देखील पिककर्ज खात्यावरील बोजा कमी केला नाही व बेबाकी प्रमाणपत्र देखील दिलेले नाही.
त्यामुळे या ऋण समाधान योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही तर याबाबत आमदार प्रकाश सोळंके यांनी जिल्हा अग्रणी बँक अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांना पत्र दिले परंतु तरी देखील बँक प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे. असे अनेक प्रकार तालुक्यातील शेतकऱ्यांसोबत घडत आहेत. त्यामुळे यावर शासनाने व बँकेने तोडगा काढावा व कर्जमाफी करून बेबाकी प्रमाणपत्र द्यावे व नव्याने जुन 2022 पासून खरिप हंगामाकरीता पिककर्ज देण्याची मागणीही शेतकरी अविनाश कांडुरे यांनी केली आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये देशातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** देशातील सर्वात मोठ्या बैलगाडा शर्यतीसाठी अवघ्या तीन तासांत २ हजाराहून अधिक बैलगाडा मालकांनी टोकन नोंदणी केलीये. एवढ्या मोठ्या प्रमाणात टोकन बुक होणारी ही इतिहासातील पहिली बैलगाडा शर्यत आहे. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून या स्पर्धा भरवण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये हा 'रेकॉर्ड ब्रेक'उत्सव होणार असून, शेतकरी, बैलगाडा मालकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती जय हनुमान बैलगाडा मंडळाचे अध्यक्ष हनुमंत जाधव यांनी दिली. टाळगाव चिखली येथील रामायण मैदानावर भाजपा शहराध्यक्ष आणि आमदार महेश लांडगे, माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव यांच्या पुढाकाराने देशातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत आयोजित केली आहे. २८ ते ३१ मे २०२२ सकाळी ७ ते सायंकाळी ७ या वेळेत अत्यंत नियोजनबद्ध ही शर्यत होणार आहे.
रामायण मैदानावरील सभागृहात गुरूवारी सकाळी ९ ते १२ या वेळेत टोकन स्विकारण्यात आले. यावेळी बैलगाडा मालकांनी मोठी गर्दी केली. या टोकनचा 'लकी ड्रॉ' काढून शर्यतीचे नियोजन करण्यात येणार आहे. एका बॉक्समध्ये २ हजार नावांच्या चिठ्ठ्या टाकल्या जातात. त्याद्वारे पहिली चिठ्ठी मिळालेला बैलगाडा पहिल्यांदा धावणार, असे नियोजन केले जाते. टोकनची रक्कम घाटात गाडा जुंपल्यावर परत दिली जाते, असे राहुल सस्ते यांनी सांगितले.

# देशातील खासगी शिक्षण क्षेत्रात बिर्ला समूहाचे योगदान मोठे : राज्यपाल

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नैतिक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. बिर्ला समूहाच्या देशभरातील शिक्षण संस्थांनी फार पूर्वीपासून भारतीय संस्कारांना महत्व दिले आहे. देशातील खासगी शिक्षण क्षेत्रात बिर्ला समूह आघाडीवर आहे. आता आंतरराष्ट्रीय शाळेच्या माध्यमातून ज्ञानदान करीत असताना देखील संस्थेने नैतिक मूल्यांची जपणूक करावी अशी अपेक्षा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी येथे व्यक्त केली. यश बिर्ला समूहातर्फे चालविण्यात येणाऱ्या बिर्ला ओपन माइंड्स आंतरराष्ट्रीय शाळेचे (आयजीसीएसई) उदघाटन राज्यपाल कोश्यारी यांच्या प्रमुख उपस्थितीत गोपी बिर्ला मेमोरियल स्कुल, वाळकेश्वर येथे बुधवारी (दि. २५) संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

स्वामी विवेकानंद यांनी शिक्षण हे मनुष्य घडविणारे असावे अशी भावना व्यक्त केली होती. केम्ब्रिज मंडळाच्या सहकार्याने बिर्ला समूहातर्फे आता आयजीसीएसई बोर्डाचे शिक्षण देत असताना देखील संस्थेने भारतीय संस्कारांशी नाळ कायम ठेवावी, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.



यावेळी यश बिर्ला समूहाचे अध्यक्ष व उद्योगपती यश बिर्ला, व्यवस्थापकीय संचालक निर्वाण बिर्ला, माजी खासदार वाय. पी. त्रिवेदी, बिर्ला ओपन माइंड्स आंतरराष्ट्रीय शाळेच्या प्राचार्या सुकृती भट्टाचार्य, गोपी बिर्ला मेमोरियल स्कुलच्या प्राचार्या डॉ. वीणा श्रीवास्तव, उद्योजक सुखराज नाहर, फॅशन डिझाइनर शायना एनसी, असिफ भामला, शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



## भोकरला गारपिटीसह पावसाने झोडपले

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील आठवड्यापासून वातावरणात बदल झाल्याने ऊन, पाऊस, वादळवारा सुरू झाला आहे. गुरूवारी (ता.२६) सायंकाळी चार वाजताच्या सुमारास जोरदार वादळीवाऱ्यासह गारपीट झाली असून आठवडी बाजार असल्याने नागरिकांची तारांबळ उडाली आहे.

उन्हाळा आता अंतिम टप्प्यात असून रोहिणी नक्षत्र सुरु झाले आहे. मागील आठवड्यापासून वातावरणात बदल झाल्याने ऊन, पाऊस वादळवारा सुरू झाला आहे. उकाड्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. शेतकरी खरीप हंगामातील कामात मश्गूल झाले असून बी, बियाणे खरेदीसाठी बाजारात गर्दी करीत आहेत. महागाईने डोकेवर काढल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. गुरूवारी शहरात आठवडी बाजार असल्याने नागरिकांची मोठी गर्दी होती. हळदा गावातही जोराचा पाऊस झाला. अचानक गारपीट, वादळीवाऱ्यासह पाऊस झाल्याने नागरीकाची चांगलीच तारांबळ उडाली आहे.

## भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा नागपुरात निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या व खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या अपमानजनक व्यक्तव्याविरोधात राष्ट्रवादी युवती काँग्रेस नागपूर शहर तर्फे निषेध म्हणून आज २६ मे २२ रोजी, युवती प्रदेशाध्यक्ष सक्षणा सलगर यांचे आदेशानुसार व नागपूर राकांपा शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे यांचे मार्गदर्शनात शहर युवती अध्यक्ष पूनम रेवतकर यांचे नेतृत्वात पक्ष कार्यालय गणेशपेठ ते मोक्षधाम घाट पर्यंत भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची प्रतीकात्मक शवयात्रा काढण्यात आली तसेच मोक्षधाम येथे विसावा व नंतर अग्नी देवून अंतिम संस्कार करण्यात आले.

यावेळी युवती शहर अध्यक्ष पूनम रेवतकर सह बबिता मांडवकर, प्रीती बेले, धनश्री बावणे, सोनल रेवतकर, नूतन रेवतकर, संगीता खोब्रागडे, ज्योती लिंगायत, शकुन सनेश्वर, सुनीता खत्री, अनिल बोकडे, प्रणय जांभूळकर, रिझवान अंसारी, महेंद्र भांगे, चंद्रकांत नाईक, मिलिंद आग्रे, शानु खरे, विश्वजित सावडिया, पुनेश ठाकरे, आकाश चिमणकर आदी उपस्थित होते.






## अंगणवाडी व प्राथमिक शाळांना डिजिटल चार्टचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा :** अध्यात्मिक गुरू रविशंकर गुरुदेव यांचे जन्मदिनानिमित्त सेवा सप्ताह अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागातील 1100 प्राथमिक शाळांना डिजिटल ऑडियो अक्षर ओळख चार्ट वाटपाचा उपक्रम अध्यक्ष शेखर भाऊ मुंदडा यांचे संकल्पनेतून, चंद्रकांत राठी यांचे मार्गदर्शनाने व सुदर्शनजी इंदानी यांचे विशेष सहकार्याने राज्यातील विविध स्वयंसेवी संस्था मार्फत राबविला गेला त्याचाच भाग म्हणून औरंगाबाद येथे द्वारकामाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने जिल्ह्यातील 10 अंगणवाड्या व प्राथमिक शाळा यांना ऑडियो डिजिटल चार्टचे वाटप छाया खाजेकर, पुजाताई सोनवणे, रोहिनीताई खैरे, संस्थेचे सचिव राजु खाजेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी अंगणवाडी सेविका सुरेखा जोशी, शोभा चोतमल, फरीदा खान, चंद्रकला सोनवणे यांची उपस्थिती होती. सर्वांनी सप्ताह काळातील या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. शैक्षणिक साधन म्हणून हे चार्ट विद्यार्थ्यांसाठी प्रभावी काम करतील तसेच शिक्षण हे मनोरंजनातून व हसत खेळत देता येईल, असा विश्वास सर्वच शिक्षकांनी व्यक्त केला. व सदरील उपक्रमाबद्दल संयोजकांचे आभार मानले. यावेळी चार्टचा वापर कसा करावा याचे प्रात्यक्षिक छाया खाजेकर यांनी विद्यार्थ्यांना करून दाखविले.

## चळवळीतील ऊर्जा तारूण्य कायम ठेवते : प्रा.जोगेंद्र कवाडे

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आंबेडकरी चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची मी फौज पाहिली त्या गर्दीत एक असा सामान्य कार्यकर्ता नारायण बागडे ला जवळून पाहिले ज्यांनी संपूर्ण आयुष्य आंबेडकरी विचारांचा वारसा पुढे चालवत आज वयाच्या ६० व्या वर्षात पदार्पण केले तरी पण तिच ऊर्जा आणि तारूण्य त्यांचे कायम आहे असे प्रतिपादन पिंपल्स रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी केले ते आंबेडकरी विचार मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. सुरेश घाटे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यमंत्री आणि ड्रॅगन पॅलेसच्या अध्यक्षा ॲड. सुलेखा कुंभारे, आंविमो चे उपाध्यक्ष नामदेवराव निकोसे, वंचित बहुजन आघाडी शहराध्यक्ष रवी बाबू शेंडे, काँग्रेस पक्षाचे नेते संजय मेश्राम, मनपा धरमपेठ झोनचे माजी सभापती सुनील हिरणवार, अमर बागडे, प्रा.राहूल मुन, आंविमो चे राष्ट्रीय महासचिव उद्धव तायडे हे होते.

यावेळी सुलेखा कुंभारे म्हणाला, जेव्हा सामान्य कार्यकर्ता हा चळवळीचे नेतृत्व करतो तेव्हा फुले, शाहू, आंबेडकर विचारधारा अधिक मजबूत होत असते. आता प्रत्येक कार्यकर्ते यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले पाहिजे. विशेषतः धम्म चळवळीला बळ देण्यासाठी आता संघर्षाची गरज



आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले. उपस्थित मान्यवरांनी नारायणरावाचा जीवनाच्या संघर्षाची गाथा सांगितली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. सुरेश घाटे यांनी आपल्या भाषणात म्हणाले, कार्यकर्ते यांच्या आर्थिक प्रश्नांवर चिंतन मनन करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रमेश दुपारे यांनी केले. याप्रसंगी नारायण बागडे आणि त्यांच्या पत्नी सुनिता ताई त्यांची नात तन्वी यांच्या सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मामासाहेब मेश्राम यांनी केले.

## ‘अक्षर मानव’चा मधुमक्षिका जीवनगौरव पुरस्कार डॉ.र.पु. फडके यांना

### ‘मधुमक्षिका जीवनसन्मान पुरस्कार’ डॉ.क.कृ. क्षीरसागर यांना प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जागतिक मधुमक्षिका पालन दिनानिमित्त अक्षर मानवसंस्थेतर्फे मधुमक्षिकापालन क्षेत्रातील आशिया खंडातील एकमेव संस्था उभी करण्यात महत्त्वाचं योगदान देणाऱ्या डॉ.र. पु. फडके यांचा ‘मधुमक्षिका जीवन गौरव पुरस्कारा’ने तर ‘मधुमक्षिका जीवनसन्मान पुरस्कारा’नं मधमाश्यांचा प्रचार, प्रसार आणि संशोधनात भरीव कामगिरी करणाऱ्या डॉ. क. कृ. क्षीरसागर यांचा नुकताच गौरव करण्यात आला.

रविवारी इंद्रधनुष्य सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते आर.आर. केडगे आणि प्रगतिशील शेतकरी व उद्योजक



बच्चे पाटील यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी अक्षर मानव मधुमक्षिकापालन विभागाचे राज्यप्रमुख प्रशांत सावंत, ज्येष्ठ नाट्यकर्मी सतीश इंदापूरकर, प्रा. प्रवीण जावळे आणि अक्षर मानव प्रशासन विभागप्रमुख सचिन पवळे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा.प्रवीण जावळे यांनी अक्षर मानवची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमात ‘मधमाशीपालनातील पुढील दिशा’ या विषयावर मान्यवरांनी मते व्यक्त केली. तसेच मधमाशीपालनाचे महत्त्वही मान्यवरांनी उलगडून सांगितले. मधमाशीपालनात अधिकाधिक लोकांनी पुढे यावे यासाठी एक चळवळ अक्षर मानवच्या वतीने उभी करण्यात येणार आहे. त्याची सविस्तर माहितीही यावेळी प्रशांत सावंत यांनी दिली. निवेदन शिल्पा रासपायले यांनी केले तर अध्यक्षीय भाषण सतीश इंदापूरकर यांनी केले, आभार प्रशासन प्रमुख सचिन पवळे यानी व्यक्त केले.

# चढ्या दराने खते, बियाणांची विक्री केल्यास होणार कारवाई

## कन्नडचे तालुका कृषिअधिकारी बाळराजे मुळीक यांचा इशारा : काळाबाजार रोखण्यासाठी कृषि विभाग सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ**

**कन्नड :** तालुक्यातील शेतकरी मागील काही दिवसांपासून खरीप हंगामाची जय्यत तयारी करताना दिसत आहेत. तसेच परिसरातील शेतकऱ्यांनी माहिती दिली की? साहेब शेती कसने पण सोपे नाही. सुरुवातीपासून मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो व केलेला खर्च निघतो की नाही याची चिंता सतत सतावत असते. कारण एक तर नैसर्गिक आपत्ति नाही तर पिकाला भावच नसतो, तसेच दिवसंदिवस वाढत्या महागाईमुळे "आम दनी अठन्नी खरचा रुपैया" सारखी गत झाली आहे.मागच्या वर्षी पाऊसाचे आगमन चांगल्या प्रमाणे झाल्याने यावर्षी पाण्याची जास्त दैना झाली नाही, मात्र अतिवृष्टिच्या पावसाणे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. ग्रामीण भागात जास्त करून अल्पभूधारक शेतकरी आहेत, ज्यांच्याकडे जमीन कमी आहे, मात्र त्याच जमिनीवर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. बहुतांश शेतकरी वर्ग पेरणीच्या वेळी उदार उसनवार करून पैसे उपलब्ध करतात, तर बहुतांश शेतकरी उधारीच्या स्वरूपात शेती साहित्यांची खरेदी करतात, मात्र कृषि दुकानातून उधार घेतलेल्या साहित्यावर कृषी चालक शेतकऱ्यांच्या मजबुरीचा फायदा घेत मनमर्जीने व्याज आकरतात.तसेच खत असूनसुद्धा खत नाही अशी उत्तरे देतात? रात्रीच्या वेळी जास्त दराने खताची विक्री करतात? तसेच साधारन बिल बनवून हातात थंबवून देतात, अशी माहिती आधुनिक केसरीचे प्रतिनिधी सय्यद आरेफ यांना नाव न सांगण्याच्या अटीवर परिसरातील शेतकऱ्यांनी दिली आहे.

या सर्व गोष्टी तालुका कृषि अधिकारी यांच्या कानावर पडताच शेतकऱ्यांना होणाऱ्या नाहक त्रासावर उपाय योजना म्हणून मंडळ अधिकाऱ्यांचे पथक तयार करण्यात आले आहे आणि हे तालुक्यात सर्वच ठिकाणी फिरणार असून रायसनिक खतांचा, बि-बियाणे, औषधींचा काळाबाजार दिसल्यास कडक कारवाई करून संबंधिताचा परवाना रद्द कराणार आहे, कारण खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी अति महत्वपूर्ण मानला जात असून याच हंगामात शेतकऱ्यांची लूट केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल, तसेच कोणाचीही 'गय' केली जाणार नाही अशी माहिती कृषि विभागाने दिली आहे.

कन्नड तालुक्यात खरीप हंगामामध्ये कापूस, मका, आद्रक तूर, सोयाबिन, भाजीपाला इत्यादी महत्त्वाची पिके घेतली जातात. तालुक्यात शेतकऱ्यांची बियाणे व खते खरेदी करताना विक्रेत्यांकडून पक्या बिलाची मागणी करावी, एखाद्या विक्रेत्यांना बिल न दिल्यास कृषी विभागाशी संपर्क साधावा, नसता स्वतः तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा. असे आवाहन कृषि अधिकाऱ्यांनी केले आहे. कृषी सेवा केंद्र चालक व कृषी निविष्ठा विक्री करणाऱ्यांना खताचा साठा, गोदामाची बाबतीत कृषी विभागाला माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे, वेळेवर माहिती न दिल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा कृषी विभागाने दिला आहे.पुढील महिन्यापासून खरीप हंगाम सुरू होणार आहे. त्यासाठी शेतकरी शेतीकडे वळले आहे तर कृषी सेवा केंद्र चालकांनी खत खरेदी करून स्टॉक करून ठेवला आहे. कृषी सेवा केंद्र चालकांनी कोणत्या गोदामात किती आणि का ठेवला? याची माहिती कृषी कार्यालयात देणे बंदकारक आहे, जर माहिती दिली नाही तर कृषी विभागाने केलेल्या तपासणीत साठा आढळून आल्यास संबंधितावर कडक कारवाई करण्यात येईल.





### गाव पातळी वर कृषि सहायकाची करडी नजर...

मोठ्या गाव पातळीवर कृषी सहाय्यक यांची नियुक्ती करण्यात येते तालुक्यातील ग्रामीण भागात कृषी सेवा केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांची कुठे फसवणूक होते कोणत्या कृषि सेवा केंद्र कड़े खाताची किंवा बियाण्याचे साठा किती आहे, यावर का बारकाईने लक्ष ठेवून असणार आहेत एखाद्या कृषी केंद्रावर गैरप्रकार होत आहे असे निदर्शनास आल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन तत्काळ कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती संबंधित विभागाच्या कृषी सहाय्यक यांनी दिली आहे.

### जिल्ह्यात 2 लाख 75 हजार 480 मैट्रिक टन खत उपलब्ध

खरिपासाठी औरंगाबाद जिल्ह्यात 2 लाख 75 हजार 480 मैट्रिक टन खत उपलब्ध झाले आहे. खरीप हंगामात दर वर्षी खतांची टंचाई निर्माण होणे नित्याचेच झाले आहे. दरवर्षी बियाणांबरोबर खतांच्या टंचाईची चिंता शेतकऱ्यांना लागलेली असते. ही टंचाई दूर करण्यासाठी कृषी विभागाने नॅनो यूरियावर भर देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. रशिया युक्रेन युद्धामुळे खतांचा तुटवडा आणि किमती वाढण्याची शक्यता लक्षात, घेता कृषी विभागाकडून खरीप हंगामाचे नियोजन करण्यात आले आहे. खरीप हंगामात मका, कपाशी,बाजरी, सोयाबीन या पिकांचे मोठ्या प्रमाणात पेरणी केली जाते. त्याचे नियोजन कृषी विभागाकडून करण्यात येणार आहे.

### शेतकऱ्यांची तक्रार नकोत

तालुक्यातील शेतकऱ्यांना नाहक त्रास दिल्यास चौकशी करून तत्काळ कार्यवाही करण्यात येईल, तसेच शेतकऱ्यांना शासनाकडून आकारन्यात आलेल्या दरात साहित्यांची विक्री करावी, परिसरातिल शेतकऱ्यांच्या अजिबात तक्रार नकोत. शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी बी-बियाने खते उपलब्ध करून द्यावीत, कोणत्याही व्यापाऱ्यानी शेतकरयांची विणाकारण अडवणूक करू नये, नसता योग्य कड़क कार्यवाही केली जाईल.

**-बाळराजे मुळीक,** तालुका कृषि अधिकारी कन्नड,

# युवकांनी नोकरीचे ध्येय डोळ्यासमोर न ठेवता उपक्रमशीलतेला चालना द्यावी



आधुनिक केसरी न्यूज

### संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा अडतिसावा दीक्षांत समारंभात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे आवाहन

**अमरावती :** युवकांमध्ये परिवर्तनाची शक्ती असते. त्यामुळे देशहित व मानवजातीच्या कल्याणासाठी योगदान देण्याचा संकल्प त्यांनी करावा. केवळ नोकरीचे ध्येय डोळ्यासमोर न ठेवता 'स्टार्टअप'सारख्या उपक्रमशीलतेला चालना द्यावी.

विद्यार्थ्यांनी ज्ञानाचे क्षेत्र अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी संशोधनाच्या नवनव्या वाटा चोखाळाव्यात, असे प्रतिपादन राज्यपाल व कुलपती भगतसिंह कोशियारी यांनी येथे केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध गुणवंतांना 111 सुवर्णपदके, 22 रौप्यपदके, 21 रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. एकूण 55 हजार 19 विद्यार्थ्यांना पदवी व 125 विद्यार्थ्यांना पदविका प्राप्त झाली.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा अडतिवासा दीक्षांत समारंभ छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात झाला.

राज्यपाल कोशियारी यांनी समारंभाला ऑनलाईन उपस्थित राहून मार्गदर्शन केले, त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत, कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, अधिसभेचे सदस्य यांच्यासह अनेक मान्यवर या वेळी उपस्थित होते.

'सर्वे भवन्तु सुखिनः' हा श्लोक उद्धृत करत राज्यपाल श्री. कोशियारी म्हणाले की, मानवजातीच्या कल्याणाचा विचार मनात ठेवून त्यादृष्टीने आपल्या कार्याची दिशा विद्यार्थ्यांनी निश्चित करावी. समाज व देशाला आपल्याला काय देता येईल, याचा विचार करावा. आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी. प्रगतीसाठी ध्येय निश्चित असणे आवश्यक आहे. प्रत्येक कार्यात अडचणी येतच असतात. पण त्यावर मात करत पुढे गेले पाहिजे. परिवर्तनाची ताकद तरुणांमध्ये आहे. देशाला व समाजाला उन्नतीची दिशा देण्यासाठी नवे मार्ग शोधावेत. संशोधनाच्या नव्या वाटा चोखाळाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

**देशसेवेचा संकल्प करा : उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत**

शिक्षण घेऊन प्रगती साधत असताना आपल्या मायभूमीचा विसर पडता कामा नये. अनेकदा विद्यार्थी परदेशी जाऊन शिक्षण पूर्ण करतात व देशात परतत नाहीत. जगभर जाऊन शिक्षण व ज्ञान मिळवलेच पाहिजे; पण आपल्या गावाचा, समाजाचा, महाराष्ट्र व देशाचा विसर पडू नये. आपल्या ज्ञानाचा देश व समाजसेवेसाठी उपयोग व्हावा. त्यामुळे आजच्या दिनी तसा संकल्प करण्याचे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. सामंत यांनी यावेळी केले.

अनेक महापुरुष, शूरवीर, संत महात्मे, विद्वान यांचा समृद्ध वारसा महाराष्ट्रभूमीला आहे.

तो आदर्श विद्यार्थ्यांनी डोळ्यांसमोर ठेवला पाहिजे. चित्रपटातील काल्पनिक पात्रांचे संवाद करमणूकीपुरते ठीक असतात. आपले आदर्श हे आपले महापुरुष असले पाहिजेत. महापुरूषांच्या विचार व कार्याचे सतत स्मरण करून समाजहित व देशसेवेसाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग होण्यासाठी योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.

**यंदाच्या अंदाजपत्रकात अनेक उपक्रमांसाठी तरतूद : कुलगुरू**

विद्यापीठाच्या विकासासाठी यंदाच्या अंदाजपत्रकात संशोधन अनुदान योजनसह दिव्यांगांच्या सोयी-सुविधेची तरतूद आहे. बुलडाणा येथील आदर्श पदवी महाविद्यालयासाठी विद्यापीठ निधीतून दीड कोटी रू., विद्यापीठ ग्रंथालयासाठी 3.69 कोटी, परिसर सुशोभीकरणासाठी 90 लक्ष रू., आयसीटी प्रकल्पासाठी 50 लक्ष रू., कुलगुरू अकादमिक गुणवत्ता पुरस्कार योजना, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी बहुसुविधा केंद्र यासाठी 1 कोटी 75 लक्ष रू. आदी तरतुदींचा समावेश केला आहे, असे कुलगुरू डॉ. मालखेडे यांनी सांगितले.

# बियाणे, खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी नियंत्रण कक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** खरीप हंगामात बियाणे आणि होऊन खतांचा शेतकऱ्यांना फटका बसू नये यासाठी कृषी विभागाने स्वतंत्र कक्ष सुरू केला आहे. या कक्षात कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून, तक्रारींची त्वरित दखल घेऊन कार्यवाही होणार आहे. कृषी निविष्ठांच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवले जाणार आहे.

खरीप हंगामात बियाणे, खते व कीटक नाशकांबाबत शेतकरी, कंपनी बियाणे, खते प्रतिनिधी व कीटकनाशके विक्रेत्यांना क्षेत्रीयस्तरावर निर्माण होणाऱ्या अडचणींचे निराकरण व्हावे, तसेच बियाणे, खते व कीटकनाशकांचे उत्पादन, प्रक्रिया, वाहतूक, वितरण व विक्री करताना अडचणी निर्माण होऊ नयेत, तसेच सद्यपरिस्थितीत दिली. निविष्ठांचा काळाबाजार व साठेबाजी रोखण्यासाठी उत्पादन, वितरण व विक्री नियंत्रित करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर १५ मे ते ३० सप्टेंबर या कालावधीत नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. हा कक्ष रोज सकाळी ८ ते सायंकाळी ८ या वेळेत सुरू राहील, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धुळे यांनी दिली आहे.



# भर उन्हाळ्यात पूर्णा नदी झुळझुळ वाहू लागली

## सातपुड्याच्या वान प्रकल्पातून पाणी सोडल्याने पशु, पक्षी, जनावरे यांचेसह नदीकाठावरील गावांना मोठा दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**पूर्णा :** आज २६ मे रोजी पुर्णा नदीला लघुपाटबंधारे उपविभाग ४ अकोला अंतर्गत येत असलेल्या पुर्णा बॅरेज दोन नेरधामणा धरणातून पाणी सोडण्यात आले, त्यामुळे पुर्णा नदी भरउन्हाळ्यात झुळझुळ वाहू लागली. २३ मे पासूनच थोड्या प्रमाणात नेरधामना धरणातून पाणी सोडण्यास सुरवात झाली. मात्र आज २६ मे रोजी मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्यामुळे भरउन्हाळ्यात पुर्णा नदीपात्रातून पाणी वाहू लागले आहे. पावसाळ्यात काठोकाठ वाहणारी ही नदी उन्हाळ्यात मात्र कोरडी होवून जाते. नदी कोरडी पडल्यामुळे नदीकाठावरील गावासह, पाण्याच्या सहाऱ्याने नदीकाठी राहणारे पशु, पक्षी, जनावरे यांना भरउन्हाळ्यात त्याचा मोठा फटका बसतो, पण यावर्षी ऐनउन्हाळ्यात पाणी सोडल्यामुळे सर्वांनाच मोठा दिलासा मिळाला आहे.

असे असले तरी, पुर्णा नदीवरील रेतीघाट घेणाऱ्या मालकांना याचा मोठा आर्थिक फटका बसणार आहे. एकतर यावर्षी रेतीघाटाचा लिलाव उशिरा झाला. त्यामुळे रेती वाहण्यासाठी



घाटमालकांना जेमतेम दोन महिण्याच्या आसपास कालावधी मिळाला. त्यातच दरवर्षीपेक्षा यावर्षी रेतीघाटाच्या लिलावासाठी मोठी किंमत मोजावी लागली. परंतु पुर्णा नदीला पाणी सोडल्याने रेतीघाट मालक मोठ्या संकटात सापडले आहे. रेतीघाटासाठी दिलेली मुळ रक्कमही निघत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

त्यातच माहुली, गोळेगाव हुरसाळ या रेतीघाटाचा लिलाव यावर्षी झाला नसल्याने त्या घाटात रेतीमाफियांनी अक्षरशः हैदोस घातला होता. रेतीतस्करांना अटकाव घालण्यासाठी महसूल प्रशासनाच्या नाकीनऊ आले होते. महसूल प्रशासनाकडून या रेतीचोरांवर पाहिजे तशी कार्यवाही यावर्षी झाली नाही. त्यामुळे कुंपनच शेत खाते की काय? काहीशी अशी परिस्थिती जळगाव जामोद महसूल प्रशासनाची यावर्षी पहायला मिळाला. परंतु नेरधामणा धरणातून पाणी सोडल्यामुळे या रेतीचोरांचे सुद्धा धाबे दणाणले आहे, त्यामुळे रेतीमाफियावरही लगाम बसला आहे.

एकंदरीत पुर्णा नदीला पाणी सोडल्यामुळे कभी खुशी कभी गम सारखी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. असे असले तरी पाणी ही जीवनावश्यक गरज आहे. पाण्याशिवाय जगणे अशक्य आहे. त्यामुळे पुर्णा नदीला पाणी सोडल्यामुळे सर्वांनाच आनंद झाला आहे. एवढे मात्र खरे !



# मक्रणपुर सोसायटीवर अब्दुल वाहब यांचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मक्रणपुर येथील विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या निवडणुकीकडे सर्वाचे लक्ष लागले होते. भल्या-भल्यांना गार करून राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अहेमद अली व अब्दुल वाहब अब्दुल असद शेख यांच्या नेतृत्वाखाली निवडणुक घेण्यात आली.

यावेळी अब्दुल वाहब, भैय्या मेंबर, संतोष जाधव, यमाजी वणे गोरख पाटील, प्रविण गर्जे, रमेश नागरे, विलास जाधव, राजु लोंढे, पोपट लोंढे, युवराज बागुल, सय्यद सादीक, सचिव रमेश राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. इतर सदस्य गैरहजर असल्याने चेअरमन, व्हाईस चेअरमन यांची निवड करण्यात आली.

अब्दुल वाहब यांनी मागील सुमारे पंधरा वर्षांत यांनी एक हाती सत्ता या सोसायटीवर ठेवल्याने त्याचीच पावती म्हणून सर्व सदस्यांनी एकमुखी चेअरमन पदावर



विराजमान केले. सदैव शेतकऱ्यांच्या हाकेला धाव घेणारे शेतकरी बांधवांच्या सुख दुःखात सामील होऊन व कृषी विभाग, तहसील, महावितरण, पंचायत समिती अश्या शासकीय कामात येणाऱ्या अडी अडचणी नेहमी सोडवतात म्हणूनच गेल्या काही वर्षापासून एकसुत्री कारभार या सोसायटीत सुरू आहे व सोसायटी ही मुनाफ्यात ठेवुन वेगळा आदर्श ठेवला आहे. यावेळी ग्रामस्थांनी अभिनंदनाचा वर्षाव केला.

# जुलैपर्यंत पुरेल नकाणे तलावाचा जलसाठा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नकाणे तलावात सध्या १७४ एमसीएफटी जलसाठा उपलब्ध असून तो जुलै महिन्यापर्यंत पुरेल, असा दावा महापालिकेकडून करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ११९ गावांमध्ये टंचाईचा सामना करावा लागत आहे.

पाणीटंचाई निवारण्यासाठी १ कोटी २४ लाख ७० हजार रुपयांची तरतूद केली आहे. धुळे तालुक्यात १७ गावांमध्ये, साक्री ४९, शिरपूर २१ आणि शिंदखेडा तालुक्यात ३२ गावांमध्ये उपाययोजना करण्याची तयारी प्रशासनाने ठेवली आहे. सध्यातरी गावात कुठेही पाणीटंचाई नाही, परंतु साक्री तालुक्यातील डोमकानी पाणीटंचाई असून, टँकरने पाणीपुरवठा सुरू केला आहे.

# जि.प.शाळांमध्ये भौतिक सुविधा अद्ययावत करून इंग्रजी माध्यमाची सुविधा सुरू करा : प्रशांत तायडे



आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाची शैक्षणिक सुविधा सुरू करून भौतिक सुविधा अद्यावत करा, अशा आशयाचे निवेदन दि.21 मे रोजी स्थानिक विश्रामगृहामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना रिपाई (गवई) बुलढाणा जिल्हा अध्यक्ष प्रशांत तायडे यांनी दिले.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात म्हणावी तशी प्रगती लागेल तरीही ग्रामीण भागातील प्रज्ञावंत विद्यार्थी यूपीएससी एमपीएससी स्पर्धा परीक्षांच्यामध्ये वर्चस्व करताना दिसत आहेत. अशा जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेतून विद्यार्थ्यांना जर इंग्रजी भाषेतून शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली तर त्यांच्या पंखांना बळ दिल्यासारखे होईल. शहरी भागातील खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये उपलब्ध सोयी-सुविधा प्रमाणे एक अंशही जरी वास्तव उतरविता आल्या तर ग्रामीण भागातील अभ्यास व कष्टाळू विद्यार्थ्यांचे स्वामी केल्यावाचून राहणार नाही. अशा शाळांमधून नेहमी गोरगरीब कष्टकरी शोषित पीडितांच्या उत्थानासाठी सदैव प्रयत्नशील राहुन या जिल्हा परिषद शाळांबाबत योग्य तो निर्णय घेऊन मागणीची तात्काळ दखल घ्यावी, अशा आशयाचे निवेदन रिपाईचे जिल्हाध्यक्ष प्रशांत तायडे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिले.

# आरोग्य सर्वेक्षणात मांसाहाराचा उल्लेख चुकीचा सांगत जैन समाजाकडून जाहीर निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण २०१ ९ -२१ चा एक अहवाल नुकताच प्रकाशित केला आहे. त्यात जैन धर्मियातील १४.९ टक्के पुरूष व ४.३ टक्के मांसाहार करीत असल्याचा उल्लेख केला आहे. हा अहवाल सर्वथा चुकीचा असून त्यामुळे जैन धर्मियांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यामुळेच या अहवालाचा देशभरातून निषेध केला जात आहे.

देशात जैन समाज अल्पसंख्याक असला तरी जगभरात जैन समाज मोठ्या प्रमाणात आहे. असे असताना केवळ १६३२ महिला व २८० पुरुषांना भेटून तयार केलेल्या या अहवालाने केवळ जैन धर्मियांचीच नव्हे तर देशाची प्रतिमा मलिन होत आहे. हा अहवाल चार भींतीच्या आत बसून दबावाखाली तयार केला असावा. जर का प्रत्यक्ष भेटून चर्चा करीत अहवाल तयार केला असेल तर त्यातील किमान शंभर लोकांची नावे जाहीर करण्यात यावी. उगाच समाजाला बदनाम करण्याचा प्रयत्न झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही. जैन समाज हा अहिंसेचा पाईक असून भगवान महाविरांची शिकवण शाकाहार हा उत्तम आहार, हे जैनांचे ब्रिदवाक्य आहे. असे असताना अहवालाच्या माध्यमातून जैन समाजाला बदनाम करण्याचे मोठे षडयंत्र रचले जात आहे. त्यामुळे या अहवालाची खातरजमा करून तो रद्द करावा व नव्याने सर्वेक्षण करून अहवाल प्रसिध्द करावा, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासनाला निवेदन दिल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर निदर्शने करीत याकडे लक्ष वेधण्यात आले. यावेळी जैन समाजाचे राजेंद्र उत्तमचंद कटारिया, अमोल ओस्तवाल, राजेंद्र सिसोदिया, के.के. ताथेड, चंद्रकांत रूणवाल, दिलीप कुचेरिया, धिरेंद्र भन्साळी, साहेबचंद जैन, ॲड. साबद्रा आदींसह सकल जैन समाजाचे पदाधिकारी व जैन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अर्भकाला पुलाखाली फेकून देणाऱ्या आई-वडिलांना तीन वर्षाची शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी परतूर यांनी पोलीस स्टेशन आष्टी गुरनं. 213/14 कलम 317 भादवि मधील अर्भकाला रायगव्हाणच्या पुलाखाली फेकून जाणारे आरोपी रेणुका परमेश्वर मोहिते आरोपी क्रमांक दोन परमेश्वर खंडू मोहिते हे दोन्ही राहणार पाथरगव्हाण या आई-वडिलांच्या विरुद्ध सदर पुरावे तपासून सखोल चौकशी करून दहा साक्षीदार तपासून सदर गुन्हा सिद्ध झाल्यामुळे दोन्ही आरोपींना प्रत्येकी तीन वर्षाचा कारावास व तीस हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. हे दोघेही पाथरगव्हाण तालुका पाथरी जिल्हा परभणी येथील आहेत. या दोन्ही आरोपींना प्रत्येकी तीन वर्षाचा शिक्षा देण्यात आली आहे व सरकारी वकील ॲड. भगवान जाधव यांनी या प्रकरणात मदत केली.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षांत 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शहराचा विकास आणि हद्दवाढ गावांचा सत्यानाश !

## पाहणी करूनही आयुक्तांचे दुर्लक्ष ! कंटाळलेल्या नगरसेवकांने स्वतः खड्ड्यांची केली डागडुजी

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** महापालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत नसल्याच्या निषेधार्थ बाळापूर प्रभाग ११च्या कर्तव्यदक्ष नगरसेवक संजय पाटील यांनी स्वतः हातात फावडे घेऊन पाईपलाईन गळतीच्या समस्यासाठी खोदण्यात आलेल्या रस्त्यांवरील खड्डे बुजवून गांधीगिरी पद्धतीने आंदोलन केले आहे. शहराचा विकास आणि हद्दवाढ गावांचा सत्यानास! असाच काही महापालिकेचा ध्यास असल्याचा आरोपही बाळापूर येथील प्रभाग क्रमांक ११ चे नगरसेवक संजय रामदास पाटील यांनी केला आहे.

एकीकडे पाण्याची भीषण टंचाई जाणवत असताना बाळापुर गावातील नगरसेवक संजय पाटील यांच्या कुशल नियोजनामुळे बाळापुर ग्रामस्थांना आठवड्यात वेळेवर पाणीपुरवठा होत आहे मात्र गेल्या दीड महिन्यापासून त्यांच्या राहत्या घराच्या परिसरात पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनची गळती झाल्याने नागरिकांना पाणीपुरवठा करण्यास अनेक अडचणी येत होत्या. विशेष म्हणजे या ठिकाणी महापालिका आयुक्त देविदास टेकाळे स्वतः उपस्थित राहून या समस्येची पाहणी करून केले व या ठिकाणी गळती शोधण्यासाठी भलेमोठे खड्डे ही तयार केले मात्र गळतीची समस्या सोडवण्यात आयुक्त देखील अपयशी ठरले. गेल्या दीड महिन्यापासून गळती सापडत नाही म्हणून भले मोठे खड्डे याठिकाणी खोदकाम केल्याने नागरिकांसाठी हा रस्ता बंद झाला. अनेक वेळा नगरसेवक संजय पाटील यांनी आयुक्त यांच्याशी भेट घेऊन संपर्क केला मात्र तरीदेखील या समस्येकडे केराची टोपली दाखवण्यात आली मात्र नागरिकांचे पाण्यावाचून हाल न पाहता कर्तव्यदक्ष नगरसेवक संजय पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन पहाटेपासूनच झालेल्या पाइपलाइन लिकेजचा शोध घेऊन त्याची दुरुस्ती करत हातात कुदळ, फावडे घेत खड्डे बुजवून निद्रिस्त कामचुकार मनपा प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त केला आहे.

अनेक वेळा संजय पाटील यांनी महापालिका प्रशासनाच्या भरवशावर न राहता स्वतः गावातील विकासकामे मार्गी लावले आहे. मनपा प्रशासनाच्या आश्वासनांना बळी न पडता स्वखर्चाने स्वतः गावाचा विकासाचा रथ पुढे नेण्याचा ध्यास त्यांनी गाठला आहे. सकाळपासून खोदकाम केलेले खड्डे बुजवत पाहताना नागरिकही थक्क झाले होते. अनेकांनी आपल्या नगरसेवकाला हातात कुदळ घेऊन काम करताना पाहून तेही मदतीसाठी पुढे सरसावले होते. त्यामुळे पुन्हा एकदा महापालिका प्रशासनाचे काम चव्हाट्यावर आणण्याचे काम नगरसेवक संजय पाटील यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांनी बनावट बियाणे, रासायनिक खतांपासून सावध राहावे : सुरेश चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** शेतकऱ्यांना योग्य व उत्तम गुणवत्तेचे बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके पुरविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी निविष्ठा खरेदी करताना काळजी घेणे गरजेचे आहे. बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके परवानाधारक विक्रेत्यांकडून खरेदी करावे, संशयास्पद अथवा बनावट बियाणे, रासायनिक + खते व कीटकनाशकांची विक्री निदर्शनास येताच सोयगाव कृषी विभाग कार्यालयास संपर्क साधावा, असे आवाहन सरपंचपती सुरेश चव्हाण (सामाजिक कार्यकर्ते)घाणेगांव तांडा ता.सोयगाव यांनी केले आहे.

बियाणे खरेदी करताना परवानाधारक विक्रेत्यांकडून खरेदी करावे. सिलबंद वेष्टनातील लेबल असलेले बियाणे खरेदी करावे. खरेदी केलेल्या बियाणांबाबत संपूर्ण तपशील जसे पीक, वाण, लेबल नंबर, वैध मुदत बियाणे किंमत खरेदीदाराचे उत्पादकाचे नाव तसेच विक्रेत्याची सही, रोख अथवा उधारीची पावती घ्यावी. छापील किंमतीपेक्षा जादा दराने बियाणे खरेदी करू नये. विशिष्ट संशोधित वाणाचा आग्रह न धरता त्याच गुणधर्माचे अधिसूचित त्याच गुणधर्माचे अधिसूचित वाणाचे प्रमाणित बियाणे शक्यतो खरेदी करावे. बियाणे खरेदी केल्यावर खरेदीची पावती, वेष्टन व त्यावरील लेबल व पिशवीतील थोडेसे बियाणे हंगाम संपेपर्यंत जपून ठेवावे. बियाणे दर्जा, उगवन क्षमता भौतिक शुद्धतेबाबत शंका आल्यास सोयगाव कृषी विभागात तक्रार नोंदवावी. रासायानिक खते परवानाधारक विक्रेत्यांकडून खरेदी करताना ई-पॉस मशीनद्वारे खते खरेदी करावीत. रासायनिक खते खरेदी केल्यावर विक्रेत्याकडून बिल पावती घ्यावी. खरेदी पावतीवर खताचे नाव, ग्रेड, किंमत व उत्पादाकाचे नाव याचा उल्लेख असणे अत्यंत आवश्यक आहे. खत खरेदी करताना वजनाची खात्री करावी, कीटकनाशके खरेदी करताना ती सीलबंद असल्याची खात्री करावी तसेच रोखी अथवा उधारीची पावती घ्यावी. कीटकनाशके खरेदी बिलावर नाव, उत्पादकाचे नाव, बॅच क्रमांक याचा उल्लेख बिलावर असणे आवश्यक आहे. याची खात्री करूनच बिलावर स्वाक्षरी करावी. कमाल किरकोळ विक्री किंमतीच्या अत्यंत कमी अथवा ज्यादा दराने विक्री होत असल्यास तत्काळ नियंत्रण कक्षाचा कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सुरेश चव्हाण घाणेगांव (सामाजिक कार्यकर्ते) यांनी केले आहे.




# बाजारसावंगीत शेतमाल संकलन केंद्राचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजारसावंगी :** विषमुक्त शेतमाल संकलन केंद्र बाजारसावंगी येथे आज दि.26 मे गुरुवार रोजी सुरू करण्यात आले. आर्ट ऑफ लिव्हिंग आणि आदीवासी मंत्रालय केंद्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने श्री नैसर्गिक शेती प्रकल्पाच्या माध्यमातून तालुका पातळीवर शेतकऱ्यांना स्वतः ची शाश्वत विक्री व्यवस्था असावी म्हणून शेतमाल संकलन केंद्र उदघाटन सोहळा आज बाजारसावंगी येथे संपन्न झाला. असेच खुलताबाद, कन्नड, फुलंब्री, सिल्लोड, वैजापूर पाच तालुक्यात शेतमाल संकलन केंद्र सुरू करण्यात आले आहे. बाजारसावंगी येथील संकलन केंद्र उदघाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून नंदकिशोर औटी तर अध्यक्षपदी आर्ट ऑफ लिव्हिंग टिचर शरद डोल्हारकर तर प्रमुख अतिथी म्हणून सुधीर चापते, प्रकल्प समन्वयक, कृषी पर्यावेक्षक राहुल गायकवाड, कृषिसहायक हिंगे, सरपंच आप्पाराव नलावडे, ग्रामपंचायत सदस्य पोपट काटकर, संजय पुंड, सय्यद लाल, पाटील, आर्ट ऑफ लिव्हिंग टिचर अंकुश गरड, किरण देशपांडे, वंदनाताई जाधव, जानकीराम नलावडे हे उपस्थित होते तर गावकरी शेतकरी मंडळी, राजेंद्र नलावडे, ज्ञानेश्वर नलावडे, संदीप नलावडे, विश्वभर नलावडे, लक्ष्मण नलावडे, पोपट पंडित नलावडे, पोपट नलावडे, बाळु घुले, भिक्कन घुले, शरद नलावडे इत्यादी शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्वमभर नलावडे, पोपट नलावडे, जानकीराम नलावडे यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रम सूत्रसंचालन जानकीराम नलावडे यांनी केले तर आभारप्रदर्शन अंकुश गरड यांनी केले. विषमुक्त अन्न आणि तणावमुक्त समाज निर्माण करत असताना आणि पिक्या असलेल्या शेतकऱ्यांना विक्या बनवणे, शेतकरी आत्मनिर्भर करणे हा मूळ उद्देश आहे. येत्या 28 मे2022 ला औरंगाबाद डॉ. आंबेडकर विद्यापीठ येथे सकाळी 10 वाजता कृषी व्यापार महोत्सव आयोजित केला आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.




# 'गोसीखुर्द' चे शेतकरी निघाले समृद्धीकडे

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील नागपूर, चंद्रपूर व भंडारा या तीन जिल्हयातील निवडक दोनशे प्रगतीशिल शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा आजपासून सुरू झाला असून आज या दौऱ्यास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर चे कार्यकारी संचालक राजेंद्र मोहिते यांचे हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ झाला.

गोसीखुर्द प्रकल्पाचा जास्तीत जास्त लाभ व्हावा यासाठी लाभधारक शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याअंतर्गत पश्चिम महाराष्ट्रातील पिक पध्दतीचा अभ्यास करून फायदेशीर पिक पद्धतींचा अवलंब करण्यासाठी दि. 25 मे ते 29 मे 2022 या कालावधीत शेतकरी समृध्दी अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेंद्र मोहिते यांचे हस्ते हिरवी झेंडी दाखवून आज अभ्यास दौऱ्याला सुरूवात झाली. या प्रसंगी गोसीखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता आशिष देवगडे, अधीक्षक अभियंता जगत टाले, कार्यकारी अभियंता किशोर दमाह, सुहास मोरे आणि इतर अभियंते उपस्थित होते.

गोसीखुर्द प्रकल्प पुर्णावस्थेकडे येताना प्रकल्पाच्या पाण्याचा सुयोग्य वापर करावा व लाभधारक शेतकऱ्यांनी पिक पध्दतीत बदल करून वैयक्तिक व राष्ट्रीय उत्पन्नात भर घालावी, या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी पंढरपूर, बारामती, इस्लामपूर, सांगोला व सोलापूर या भागातील उस लागवड, आमराई फळबाग, कृषी विद्यापीठ संशोधन केंद्र, उस कारखाना व निवडक शेतांना भेट देवून पाहणी करणार आहेत. उस लागवडीमधील तज्ञ, कृषीरत्न संजय माने यांच्या शेताला भेट देवून त्यांचेही मार्गदर्शन गोसीखुर्द प्रकल्पाच्या लाभधारकांना मिळणार आहे. शनिवार दि.२८ मे रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री जयंत पाटील हे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. गोसीखुर्द प्रकल्पातील लाभधारकांना प्रकल्पाच्या पाण्याचा जास्तीत जास्त लाभ घेण्याच्या दृष्टीने पुढाकार घेण्याचे आवाहन गोसीखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता आशिष देवगडे यांनी केले आहे.

DON'T NEGLECT YOUR HEALTH
HEALTH IS WEALTH
A TRUSTED SUPAR MARKET IN CITY



MAHAVIR
GHAR SANSAR

- Wholesale & Retail
- Kirana, Dry Fruits, Spices
- Crockery, Home Appliances
- Home Cleaning Material, Steel & Aluminium
- Plastic Items & Many More

Sumit 7620111118
Rajesh Jain 758834738
Ramesh Jain (Crockery) 9860481142 7620111117
WhatsApp Order & Any Order 9850017181
Delivery Status 9021395308 9657398232
Wholesale Enquiry 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. Road, Chelipura, Shahgunj, Aurangabad
Plot No. A25, Opp MIDC Police Station MIDC Chikalthana, Aurangabad